(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पू.शी. / मु.शी. : तोंडी उत्तरे

सन १९९९-२००० पासून विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या तुकड्यांना अनुदान देण्याबाबत

(१) * १२८४४ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : दिनांक २२ जुलै, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या दहाव्या यादीतील प्रश्न क्रमांक ४७४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९९-२००० नंतर विना अनुदान तत्वावर मंजूर केलेल्या व अनुदानास पात्र ठरणाऱ्या तुकड्यांना अनुदान देण्यासाठी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, किती तुकड्या अनुदानास पात्र ठरल्या व त्या तुकड्यांचे अनुदान वितरित करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) अद्याप अनुदान वितरित करण्यात आले नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ, प्रा वसंत पुरके यांच्याकरिता : (१) नाही.

(२) सुमारे ३९३७ तुकड्या अनुदानास पात्र ठरत आहेत.

(३) आर्थिक तरतूद उपलब्ध झाल्यावर वितरित करण्यात येईल.

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, गेल्या 7-8 वर्षापासून विनाअनुदान तत्वावरील शाळा अनुदान तत्वावर आलेल्या नाहीत. सभापती महोदय, उत्तरामध्ये असे दिलेले आहे की, " सुमारे 3937 तुकड्या अनुदानास पात्र ठरत आहेत. " हा प्रश्न नागपूरच्या अधिवेशनात दिनांक 16 डिसेंबर, 2005 ला देखील आला होता. त्यावेळी येत्या मार्चमध्ये कोणत्याही परिस्थितीत अनुदान देण्यात येईल, असे माननीय मंत्रीमहोदयांनी म्हटले होते. नियतव्यय उपलब्ध करुन देण्याबाबत देखील माननीय मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले होते. सभापती महोदय, आता मार्च संपत आलेला आहे. आपण पुढच्या मार्चला या तुकड्यांना अनुदान देणार आहात काय ? तरी, माननीय मंत्रीमहोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, दिनांक 31 मार्चपूर्वी आपण या संदर्भातील यादी जाहीर करणार का ? आणि मागील अधिवेशनात आश्वासन दिल्याप्रमाणे एप्रिल महिन्यामध्ये अनुदान देणार का ?

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 12844 ..

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे. ह्या तुकड्यांना मार्चच्या बजेटमध्ये निधी उपलब्ध करुन देऊ असे नागपूरच्या अधिवेशनामध्ये सांगितले होते. परंतु वित्त विभागाने आऊटले उपलब्ध करुन दिला नाही. गेल्या आठवड्यामध्ये माध्यमिक शाळांच्या संदर्भात देखील प्रश्न आला होता. या तुकड्यांना आणि शाळांना येत्या एप्रिलमध्ये प्लॅनिंग सब कमिटीकडून आऊटले उपलब्ध करुन देऊ असे माननीय वित्त मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनासंदर्भात त्यावेळी सांगण्यात आले होते. सभापती महोदय, कोणत्याही परिस्थितीमध्ये या दोन्हींची तरतूद करण्यात येईल, असे यापूर्वीही सांगितले होते.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण याद्या फक्त छापून ठेवू नका. याद्यांमध्ये भ्रष्टाचार होत आहे. आपण यादी जाहीर करणार म्हटल्यावर लोक मुंबई व पुण्याला जातात. तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, आपण या संदर्भातील यादी केव्हा जाहीर करणार ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्राथमिक शाळांच्या तुकड्या 643 आहेत, त्यांना 22 कोटी 50 लाख रुपये लागतात. माध्यमिक शाळांच्या तुकड्या 3937 आहेत, त्यांना 22 कोटी रुपये लागतात. तसेच, उच्च माध्यमिक शाळांच्या तुकड्या 740 आहेत, त्यांना 5 कोटी रुपये लागतात. अशाप्रकारे सभापती महोदय, या सर्वांसाठी एकूण निधी 49 कोटी रुपये लागतो. सभापती महोदय, शाळांची यादी जाहीर केली की, अनुदान केव्हा मिळणार, असे लोक विचारतात. त्यामुळे आम्ही ह्या याद्या दिनांक 30 एप्रिलपर्यंत निश्चितपणे जाहीर करु.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा फार गंभीर प्रश्न आहे. यादीचे गुप्तधन ठेवण्यामध्ये भ्रष्टाचार वाढत आहे. गेल्या 10 वर्षांपासून सातत्याने मान्य झालेल्या विषयाला माननीय मंत्रीमहोदय वेगळे वळण देत आहेत. तुम्ही अनुदान देतो असे सांगितले आहे, त्या संदर्भात मी काही बोलत नाही. परंतु यादी जाहीर करण्यामध्ये आपल्याला अडचण काय आहे ? भ्रष्टाचाराला पांघरुन घालायचे नसेल तर, आपण आतापर्यंत ही गोष्ट मान्य केली पाहिजे होती. सभापती महोदय, दिनांक 30 मार्चपर्यंत यादी जाहीर करण्यामध्ये कोणती अडचण आहे ? व अडचण नसेल तर, आपण केव्हा यादी जाहीर कराल ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दिनांक 31 एप्रिलपर्यंत आम्ही यादी जाहीर करु.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 12844 ..

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, दिनांक 31 मार्चपर्यंत आपण यादी जाहीर करणार का ? आणि माननीय मंत्रीमहोदयांनी हळूच सांगितले की, दिनांक 30 एप्रिलपर्यंत यादी करु. एप्रिल म्हणजे आपण एप्रिल फूल करणार आहात का ? तरी, असे काही करु नका. आपण दिनांक 31 मार्चपर्यंत यादी जाहीर करा.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही यादी एप्रिलच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यामध्ये जाहीर करु व दिनांक 30 एप्रिलपर्यंत अनुदान देऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, तुम्ही अनुदान देत नाही तर देत नाही. मागील अधिवेशनात हे अनुदान मार्च महिन्याच्या अगोदर देऊ असे सांगितले होते. आता एप्रिलमध्ये देऊ असे आपण सांगत आहात. सभापती महोदय, अनुदानाच्या संदर्भात आपली यादी काढून ग्रँट मिळवून देऊ असे म्हणणाऱ्या दलालांचा मंत्रालयामध्ये सुळसुळाट झालेला आहे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

अनुदानास पात्र ठरणाऱ्या तुकडयांची यादी जाहीर का करण्यात येत नाही ? तुकडयांची यादी जाहीर न केल्यामुळे दलालामार्फत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार वाढत आहे. आपणाला यामध्ये भ्रष्टाचार होऊ द्यावयाचा आहे काय ? अधिकाऱ्यांनी लक्ष्मी दर्शन घ्यावे असे सरकारचे धोरण आहे काय ? भ्रष्टाचार जर आपणास होऊ द्यावयाचा नसेल तर 31 मार्च पर्यंत अनुदानास पात्र ठरणाऱ्या तुकडयाची यादी जाहीर करणार काय ? यादी जाहीर करुन अनुदानाचे वाटप लवकरात लवकर करणार आहात काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एप्रिलच्या पहिल्या आठवडयामध्ये अनुदानास पात्र ठरणाऱ्या तुकडयांची यादी जाहीर करण्यात येणार आहे. 31 मार्च पर्यंत निधी उपलब्ध झाल्यानंतर एप्रिलमध्ये निधीचे वाटप करण्यात येणार आहे. भ्रष्टाचारास कोणत्याही प्रकारे वाव मिळणार नाही असे शासनाचे धोरण आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तर क्रमांक 2 मध्ये असे म्हटलेले आहे की, 3937 तुकडया अनुदानास पात्र ठरत आहेत, याचाच अर्थ किती तुकडया आहेत व त्या कोणत्या जिल्हयातील आहेत ही सगळी यादी शासनाकडे तयार आहे, त्यामुळे ही यादी 31 मार्च पर्यंत जाहीर करण्यात येईल काय ? सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी स्पष्टपणे उत्तर देण्यात आले होते की, कोणत्याही परिस्थिती आम्ही अनुदान देऊ. आता सुध्दा मंत्री महोदय सांगत आहेत की, आम्ही 30 एप्रिल पर्यंत अनुदान देऊ, जर हेही आश्वासन पाळले नाही तर आम्ही पुढे काय करायचे ?

श्री. हसन मुश्रीफ : या संदर्भातील उत्तर मी सुरुवातीलाच दिलेले आहे.

प्रा. फौजीया खान : माननीय सभापति महोदय, मुझे पूछना है कि यह यादी गुप्त रखने के वेलीड रीजन क्या हैं और मुझे यह भी पूछना है कि इन टुकडियों में से उर्दू माध्यम की टुकड़ियां कितनी हैं ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यादी गुप्त ठेवण्याचे काहीही कारण नाही. यासंदर्भात मी मघाशीच सांगितले आहे.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र....12844....

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, विना अनुदानित तत्वावर ज्या शाळा आहेत त्यातील शिक्षक अनुदान मिळण्यासाठी उपोषणास बसले होते, त्यावेळी उपोषणास बसलेले काही शिक्षक व मी स्वत: मंत्री महोदयांची भेट घेतली तेव्हा मंत्री महोदयांनी सांगितले की, मार्च पर्यंत सर्व पैसा देण्यात येणार आहे, तिजोरी आता भरलेली आहे. तिजोरी भरलेली आहे तर मग आता अनुदान देण्यास टाळाटाळ का करण्यात येत आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 30 एप्रिल, पर्यंत अनुदान देण्यात येणार आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, एप्रिल पर्यंत अनुदान देण्यात येईल. परंतु अनुदान जाहीर करुन सुध्दा देण्यात येत नाही. माझे म्हणणे असे आहे की, ज्या तुकडयां 14 जुलै, 2000 च्या शासन निर्णयाप्रमाणे अनुदान तत्वावर येतात त्यातील काही तुकडया आता 20 टक्के, 40 टक्के व 60 टक्के अनुदानावर आलेल्या आहेत. गेल्या 5 ते 6 वर्षापासून हया तुकडया अनुदानवर आलेल्या असतांना त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने त्या-त्या वर्षातील अनुदान आपण देणार आहात काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाचे धोरण टप्प्या टप्प्याने अनुदान देण्याचे आहे, ते आम्ही देत आहोत.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, तुकडयांची संख्या मंत्री महोदयांनी जाहीर केलेली आहे, त्यामध्ये 3937 तुकडयांना अनुदान देण्यात येणार आहे. हया तुकडया कोणकोणत्या माध्यमाच्या आहेत, याबाबत शासनाने खुलासा करावा.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय यामध्ये सर्व माध्यमांच्या तुकडया आहेत, तुकडयावाईज माहिती आता माझ्याकडे नसल्यामुळे ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, बऱ्याच ठिकाणी बोगस पॉईंट व हजेरी पट दाखवून तुकडयांना अनुदान घेण्यात येत आहे, अशा बोगस तुकडयांना मान्यता देण्यामध्ये संचालक, उप संचालक व शिक्षणाधिकारी यांचा समावेश असल्याने आपण त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ?

यानंतर श्री. सांगळे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12844 .....

श्री.हसन मुश्रीफ : स्पेसिफिक नावे दिल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : 161 तुकडया बोगस असल्याबाबत माझ्या स्वत:च्या सहीने माननीय मंत्रिमहोदयांना आणि संचालकांना पत्र पाठवली आहेत. काल झालेल्या पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी सुध्दा मी हा विषय उपस्थित केला होता. सभापती महादय, संस्थांपेक्षा जे तुकडयांना मान्यता देतात अशा अधिका-यांवर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. शासन अशा अधिका-यांवर कारवाई करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : पूरक मागण्यांच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या संदर्भात तक्रार केली होती. सन्माननीय सदस्यांचा याबाबतीत आग्रह असेल तर या वर्षी सुध्दा त्याबाबत चौकशी करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सर्व भाषांच्या तुकडयांना मान्यता देण्यात येईल असे माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी उर्दूच्या किती तुकडयांना मान्यता देणार आहात असा माननीय मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. परंतु त्यांच्या प्रश्नाचे माननीय मंत्रिमहोदयांकडून काहीच उत्तर आले नाही.

श्री.हसन मुश्रीफ : याबाबतची माहिती या ठिकाणी माझ्याकडे उपलब्ध नाही. मी याबाबतची सर्व माहिती नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकऱ्यांसाठी घोषित करण्यात आलेल्या विशेष पॅकेजमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश करण्याबाबत

(२) * १५८०४ श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदिश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांसाठी घोषित करण्यात आलेल्या विशेष पॅकेज मध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश करा, या मागणीचा ठराव नागपूर जिल्हा परिषदे तर्फे शासनास माहे जानेवारी, २००६ मध्ये सादर केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पॅकेज मध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, समावेश न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. नारायण राणे : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर पॅकेज हा एक पथदर्शी कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमजबजावणीच्या यशापयशावर पुढील धोरण व दिशा ठरविण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर जिल्हयांमध्ये शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या असल्यामुळे नागपूर जिल्हा परिषदेने सुध्दा शेतक-यांसाठी घोषित करण्यात आलेल्या विशेष पॅकेजमध्ये नागपूर जिल्हयाचा समावेश करावा अशी विनंती केलेली आहे. नागपूर जिल्हयामध्ये मौदा व रामटेकचा काही भाग सोडल्यास तसेच उमरेड व भिवापूरचा 25 टक्के भाग सोडल्यास नागपूर जिल्हयातील इतर सगळा कापूस उत्पादकांचा भाग आहे. या भागांमध्ये 10 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एकूण राज्यातील 20 लाख एकरातील 22 लाख शेतकरी या पॅकेज मध्ये असलेल्या मदतीसाठी पात्र आहेत. परंतु या पॅकेजमधून नागपूर जिल्हयातील शेतक-यांना वगळलेले आहे. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, माझ्याकडे सर्वसाधारणपणे एकरी 2 क्विटंल कापसाचे उत्पन्न झाले आहे. तसेच त्याचा भाव 1800 रुपयांवरुन 1500 रुपयांपर्यंत खाली आला आहे. यासाठी एकूण खर्च रु.4500 एवढा झालेला आहे. तसेच अनेक ठिकाणी बी.टी.कॉटनचे कमी उत्पन्न झाले आहे. याबाबतीत विदर्भामध्ये रिशेड्युलमेंटची जी सवलत देत आहात त्या संदर्भात आपण चौकशी केल्यास आपल्याला असे आढळून येईल की, भूविकास बँक, जिल्हा सहकारी बँकेंतील कर्जांची तीच स्थिती आहे. कापूस उत्पादक क्षेत्रांसाठी पॅकेज दिले पाहिजे. ज्या ठिकाणी धान असेल त्या ठिकाणी सवलत देऊ नका, परंतु धानाच्या ठिकाणी सुध्दा अतिशय गंभीर स्थिती आहे. म्हणून नागपूर जिल्हयाला व अन्य कापूस उत्पादक क्षेत्र सुटले असेल तर ते कव्हर करण्याच्या दृष्टीने या पॅकेजमध्ये समावेश करण्याबाबतचा शासन निर्णय घेणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, दि.19/12/2005 रोजी जाहीर करण्यात आलेल्या विशेष पॅकेजमध्ये नागपूर जिल्हयातील समावेश करण्यात यावा अशी त्यांची विनंती आहे. या पॅकेजमध्ये घेण्यात आलेल्या सहा जिल्हयांमध्ये गेल्या वर्षी आणि यावर्षी शेतक-यांच्या आत्महत्येच्या संख्या मोठया प्रमाणात आहे. त्या ठिकाणी अतिशय भयावह परिस्थिती आहे. म्हणून शासनाने सहा जिल्हयांसाठी 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. नागपूरच्या काही गावांमध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे परिस्थिती असेल, त्यांच्या मताशी मी सहमत आहे. माझ्याकडे सर्व नागपूर जिल्हयातील बी.टी. कॉटन, सोयाबीन, धान्य, ज्वारी, तूर तसेच कापूस व फळबागामध्ये असलेले संत्रा याबाबतची सगळी आकडेवारी आहे. परंतु पॅकेजमध्ये समावेश करण्यात आलेल्या सहा जिल्हयांमध्ये झालेल्या शेतक-यांच्या आत्महत्यांच्या तुलनेत येथील प्रमाण कमी आहे. म्हणून शासनाने या 6 जिल्हयांमध्ये आत्महत्या होऊ नयेत म्हणून विशेष पॅकेज जाहीर केले व त्याची अंमलबजावणी सुरु आहे. या सहा जिल्हयांमध्ये पॅकेजची अंमलबजावणी यशस्वी झाली तर लगतच्या जिल्हयांमध्ये आत्महत्या होत आहेत .....

(यानंतर श्री.सुंबरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये नागपूर आहे, त्याचाही विचार केला जाईल असे मला सांगावेसे वाटते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता नामदार मंत्र्यांनी माननीय सदस्य श्री.गडकरी यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, जेथे आत्महत्या झालेल्या आहेत वा होत आहेत त्या जिल्ह्यांमध्ये आपण ही योजना वा पॅकेज राबवित असून तेथील या योजनेचे यशापयश पाहून इतरही जिल्ह्यांमध्ये ती सुरू करू. म्हणजे विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्याला जे काही नुकसान झालेले आहे, त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती बिघडलेली आहे, त्याचा कर्जबाजारीपणा वाढत आहे म्हणून सरकारने हे पॅकेज जाहीर केलेले आहे. तेव्हा तेथे व इतरही जिल्ह्यांमध्ये आत्महत्या होण्याची वाट न पाहता सर्वच कापूस उत्पादक शेतकरी आहेत, मग ते विदर्भातील असोत वा मराठवाडा, खानदेशातील असोत., त्यांच्याबाबतीत या योजनेचे यशापयश तुम्ही कसे पाहणार आहात, त्यासाठी आपल्याकडे काय यंत्रणा आहे ? तेव्हा आणखी आत्महत्यांची वाट न पाहता सर्वच कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही योजना वा पॅकेज आपण जाहीर कराल काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आत्महत्या वाढत आहेत वा कमी होत आहेत यावर या योजनेचे यशापयश होते असे नाही तर या 6 जिल्ह्यांसाठी आपण हे पॅकेज दिले आहे तेथे त्याची अमलबजावणी आपण करू आणि त्यानंतर त्या भागामध्ये आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले आहे किंवा बंद झाले तर मग ही योजना अन्य जिल्ह्यांमध्ये देखील राबविण्याचा सरकारचा विचार आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी माहिती विचारीत असताना अन्य जिल्ह्यांमध्ये जेथे कापूस उत्पादन होत आहे तेथे सर्वच ठिकाणी पॅकेज घोषित करावे असे सांगितले. मी एवढेच सांगेन की, दोन चार महिन्यांमध्ये या योजनेच्या अमलबजावणीचा जो काही रिझल्ट येईल तो पाहिल्यानंतर इतर जिल्ह्यांचा देखील विचार केला जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, येथे जो प्रश्न विचारण्यात आला आहे त्यामागील भावना अशी आहे की, एकूण कृषी व्यवसायामध्ये हा जो तणाव आलेला आहे तो कमी व्हावा. विदर्भातील या सहा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत कारण तेथे सिंचनाची सुविधा नव्हती त्यामुळे तेथे आत्महत्यांचे प्रमाण वाढले. म्हणून प्रभाकर वैद्य यांच्या हेल्प लाईनने एक मागणी सरकारकडे केलेली आहे की, जेथे 1 हजार कोटीच्या वर सिंचनाचा अनुशेष आहे त्यांना सानुग्रह अनुदान म्हणून 10 हजार रूपये प्रति हेक्टरी दिले जावेत. म्हणून या निमित्ताने माझा

..... डी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी.टी.देशमुख (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 15804 ....

नेमका प्रश्न आहे की, हेल्प लाईनने माननीय मुख्यमंत्र्यांना एक निवेदन दिलेले आहे त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, जेथे सिंचनाचा अनुशेष 1 हजार कोटीच्या वर असेल तेथे आपण खास लक्ष दिले पाहिजे, तेथे सानुग्रह अनुदान दिले पाहिजे अन्यथा तेथील अनुशेष वाढत जाणार आहे. म्हणून ज्या जिल्ह्यांचा सिंचनाचा अनुशेष एक हजार कोटीच्या वर आहे तेथे कोरडवाहून शेतीसाठी हेक्टरी 10 हजार रूपये आणि जेथे अनुशेष एक हजार कोटीच्या कमी असेल तेथे 5 हजार रूपये प्रति हेक्टर याप्रमाणे सानुग्रह अनुदान द्यावे. तर शासनातर्फे या सुचनेचा विचार केला जाईल काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या प्रश्नाचा आणि सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा तसा संबंध नसला तरी त्यांची सूचना चांगली आहे. शासन याबाबतीत तपासून पाहून शेतकऱ्यांच्या दृष्टीने अवश्य विचार करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न विचारण्यामागील मूळ कारण असे आहे की, विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी सरकारने हे पॅकेज जाहीर केलेले आहे. हे सहाही जिल्हे कापूस उत्पादक जिल्हे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी असाही मुद्दा मांडला की, केवळ हे सहाच जिल्हे कापूस उत्पादक आहेत असे नाही तर राज्यात असे 14-15 जिल्हे कापूस उत्पादक जिल्हे म्हणून ओळखले जातात. मात्र हे खरे आहे की, या सहा जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे आणि हे प्रमाण व हे प्रकार हळूहळू महाराष्ट्र भर पसरत आहे. आपण ज्या सहा जिल्ह्यांसाठी हे पॅकेज घोषित केल्यानंतर देखील तेथे 250-300 आत्महत्या झालेल्या आहेत. ..

(यानंतर श्री. सरफरे ..... इ 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

ता.प्र.क्र. 15804...

श्री. पांडुरंग फुंडकर...

अगोदरच विदर्भावर अन्याय होत आहे. विदर्भामध्ये प्रचंड अनुशेष निर्माण झाला आहे, विदर्भाला न्याय मिळत नाही. या ठिकाणी आपण दोन भाग केले. विदर्भातील 6 जिल्हयांना आपण पॅकेज जाहीर केले, आणि उर्वरीत जिल्हयांना पॅकेज जाहीर केले नाही. त्यामध्ये धान उत्पादक शेतकरी असेल, कापूस उत्पादक शेतकरी असेल. उर्वरीत जिल्हयातील या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत असल्यामुळे त्या जिल्हयांना पॅकेज जाहीर करण्यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करणार काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी उत्तरामध्ये सांगितले आहे. 6 जिल्हयामध्ये आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या व इतर जिल्हयातील आत्महत्त्या केलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी संख्या यामध्ये तफावत आहे. सभापती महोदय, 6 जिल्हयामध्ये जवळपास 250 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. त्याकरीता शासनाने युध्द पातळीवर शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले. ते जाहीर करीत असतांना वेगवेगळया 19 सवलती सुध्दा दिलेल्या आहेत. याची अंमलबजावणी करीत असतांना 6 जिल्हयामध्ये शेतकऱ्यांचे आत्महत्त्या करणे बंद झाले व या पॅकेजला मिळालेले यश पाहून अन्य जिल्हयामध्ये ही योजना राबविण्याचा शासन विचार करील. तसेच, जाहीर केलेल्या 19 सवलतीपैकी काही सवलती फक्त 6 जिल्हयामध्ये दिल्या जात नसून बाकीच्या जिल्हयामध्ये सुध्दा दिल्या जात आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या सहा जिल्हयातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्त्यांचे प्रमाण पाहून पॅकेज जाहीर केले.ज्या भागामध्ये आत्महत्त्यांचे प्रमाण कमी आहे त्या भागामध्ये पॅकेज जाहीर केले जाणार नाही असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? दुसरा प्रश्न असा आहे की, पॅकेज जाहीर करण्यासाठी जे निकष आहेत त्यामध्ये आपण फेरबदल केले आहेत काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, निकषामध्ये कोणतेही फेरबदल केलेले नाहीत. आत्महत्त्यांची संख्या पाहून पॅकेज जाहीर करावयाचे असे शासनाचे धोरण नाही. दिवसें दिवस आत्महत्त्या वाढत चालल्या आहेत. आणि त्यासंबंधी सदनामध्ये वारंवार चर्चा उपस्थित होत आहे. अनेक माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी शासनाने युध्द पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत अशी मागणी केली. त्या अनुषंगाने अनेक सूचना करण्यात आल्या होत्या त्यापैकी पॅकेजची एक सूचना होती. त्याचप्रमाणे कर्ज फेडीमध्ये सवलत देणे, हेक्टरी मदत करणे वगैरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे...

प्रकारच्या सवलती जाहीर केल्या आहेत. या योजनेचा रिझल्ट पाहून बाकीच्या जिल्हयामध्ये पॅकेज योजना राबविण्याचा शासन विचार करील.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या योजनेचे यशापयश मंत्रिमहोदय किती दिवसात तपासणार आहेत? तशी मुदत सभागृहाला समजली तर बरे होईल.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या योजनेमध्ये आतापर्यंत जवळपास 600 कोटी रुपये खर्च झाले आहेत. वर्षभरामध्ये 1075 कोटी रुपये खर्च झाल्यानंतर व योजनेचा रिझल्ट मिळाल्यानंतर ही योजना त्वरीत अन्य जिल्हयामध्ये राबविली जाईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, पॅकेज जाहीर केलेल्या 6 जिल्हयामध्ये पॅकेज जाहीर झालेल्या दिनांकापासून आतापर्यंत किती शेतकऱ्यांनी लाभ घेतला?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, 6 जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांसाठी योजना राबविली जात असून त्यामध्ये अमूक एका शेतकऱ्याला लाभ मिळाला व अन्य शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही असे झालेले नाही. या 6 जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांना लाभ मिळावा यासाठी 19 सवलती दिल्या आहेत. त्यामध्ये काही शेतकऱ्यांनी दोन सवलती घेतल्या आहेत, तर काही शेतकऱ्यांनी चार सवलती घेतल्या आहेत, तर काही शेतकऱ्यांनी 19 सवलती देखील घेतल्या आहेत. त्यामुळे निश्चित अशी आकडेवारी सांगता येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये चांगली सुधारणा केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पहिल्यांदा उत्तर देतांना ते असे म्हणाले होते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या प्रमाणावर आम्ही पॅकेज जाहीर केले. नंतर त्यांनी आत्महत्त्यांच्या प्रमाणावर पॅकेज जाहीर केले नाही असे सांगितले. वाशीम, नांदेड व परभणी या जिल्हयांमध्ये आत्महत्त्यांचे प्रमाण जास्त आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15804 (पुढे सुरु...

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

म्हणजे आत्महत्येवर पॅकेज नसेल तर जिथे आत्महत्या होतात, तिथे सरकार त्याचा विचार करेल. वाशिम आणि इतर जिल्ह्यांपेक्षा नांदेड आणि परभणीमध्ये जास्त आत्महत्या झालेल्या आहेत, त्या संदर्भात तातडीने आपण विचार करणार आहात काय ?

श्री.नारायण राणे : सन्माननीय सदस्यांनी ज्या जिल्ह्यांचा उल्लेख केला, त्या जिल्ह्यांची माहिती घेतली जाईल. तसे असेल तर त्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री महोदय सांगतात की, पॅकेज यशस्वी झाले, की नाही हे पहावे लागेल, मग आम्ही निर्णय घेऊ. मला वाटते, त्यांना यासंबंधीची माहिती का कळत नाही ? माहीत नाही. कदाचित ते दिल्लीमध्ये जास्त असल्यामुळे त्यांना कळाले नसेल. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे यवतमाळ येथे आले असतांना, तेथे यात्रा निघाली. यात्रा ही माजी मंत्री श्री.माणिकराव ठाकरे यांनी काढली. तिचा समारोप मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेबांनी केला. त्यांनी हे पॅकेज फार यशस्वी झाले, या पॅकेजमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला, अशाप्रकारचे भाषण केले. मुख्यमंत्री एकीकडे पॅकेज यशस्वी झाले असे म्हणतात आणि सन्माननीय मंत्री महोदय अजून तपासायचे आहे असे सांगतात, खरी वस्तुस्थिती काय आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, कापूस उत्पादक क्षेत्राला पॅकेज दिले पाहिजे. तुम्ही नागपूर विभागातील वर्धा जिल्हा घेतला... ती तांत्रिक चूक होऊ शकते. गडचिरोली, भंडारा, या दोन जिल्ह्यामध्ये 100 टक्के धान उत्पादन होते. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोडा तहसिल आणि राजुरा तहसिल या ठिकाणी थोडे कापसाचे पीक घेतले जाते.

सभापती : आपला प्रश्न काय आहे ?

श्री.नितीन गडकरी : माझा प्रश्न एवढाच आहे की, नागपूर जिल्ह्यातील कापूस क्षेत्र तुम्ही वगळले, चंद्रपूर जिल्ह्यातील कापूस क्षेत्र वगळले, त्या ठिकाणी तीच परिस्थिती आहे. आंध्र प्रदेशपासून, आदिलाबाद, यवतमाळ पासून कापसाचे उत्पादन कमी झालेले आहे. तुम्ही निर्णय घेतांना विदर्भातील सहा जिल्हये घेण्याच्या ऐवजी जिथे कापूस उत्पादक क्षेत्र आहे, त्या ठिकाणी हा निकष ठेवायला पाहिजे. ते क्षेत्र फार कमी आहे, विशेष असे नाही. त्यांना यामध्ये अंतर्भूत करण्यात येईल काय ? माननीय मुख्यमंत्री हे पॅकेज यशस्वी झाले असे म्हणतात, तेव्हा पुढचेही घोषित करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, तो कार्यक्रम राजकीय स्वरुपाचा होता. नवीन योजना आल्यानंतर त्या योजनेचे प्रबोधन करावे लागते, त्याचा एक भाग म्हणून यवतमाळ येथे अशाप्रकारचा कार्यक्रम घेतला असेल.

श्री.नितीन गडकरी : प्रबोधन करण्याचा मुद्दा नाही. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसतर्फे एक पदयात्रा काढण्यात आली, त्या पदयात्रेचा समारोप माननीय मुख्यमंत्र्यांनी केला. तेथे त्यांनी जाहीरपणे सांगितले...

सभापती : सन्माननीय गडकरी साहेब आपला प्रश्न मंत्री महोदयांनी शांतपणे ऐकून घेतला, आता मंत्री महोदयांचे उत्तरही आपण शांतपणे ऐकूण घेतले पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : ते वेगळेच काही तरी उत्तर देत आहेत.

श्री.नारायण राणे : मी उत्तराला सुरुवात देखील केली नाही. उत्तराला सुरुवात करण्याअगोदरच सन्माननीय सदस्य उभे राहिले. मी काय बोलणार, हे त्यांना अगोदर कळते कारण त्यांची-माझी मैत्री असल्यामुळे त्यांना लवकर समजते असे मला वाटते. सभापती महोदय, मला सांगावयाचे आहे की, आत्महत्या आणि पॅकेज हा विषय वेगळा आहे. पॅकेज जाहीर केल्यानंतर त्या संबंधात कोणता तरी समारंभ घेतला असेल तर त्याबाबत मला भाष्य करायचे नाही. मुळात त्यांचा प्रश्न आहे की, कापूस उत्पादन जिथे जिथे होते, त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती आहे. आत्महत्येचे प्रमाण पहाता, मी एवढेच सांगेन की, पॅकेज हे सहा जिल्ह्यापुरते आहे, भविष्यामध्ये बाकीच्या जिल्ह्यांचा शासन विचार करेल.

अशुद्धीत प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग 11 व 12 वी च्या तुकड्यांच्या अनुदानाबाबतची अनियमितता दूर करणेबाबत

(3) * 12891 श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती विभागात एकाच कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग 11 वी च्या तुकडीवरील शिक्षकांना अनुदान मंजूर केले मात्र वर्ग 12 वी ची तुकडी निकषपात्र ठरुनही अनुदान मंजूर झाले नाही या बाबतचे एक निवेदन दिनांक 19-11-2005 किंवा त्या दरम्यान जिल्हा कार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ अकोला यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ प्रा वसंत पुरके यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) निधी उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. निधी उपलब्ध होताच अनुदान मंजूर करण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या अगोदर वर्ग तुकड्या अनुदानावर आणण्याबाबतची पहिल्या प्रश्नामध्ये चर्चा झालेली आहे. अमरावती विभागामध्ये अकरावी आणि बारावीच्या तुकडयांच्या अनुदान वाटपामध्ये अनियमितता झालेली आहे. आता शासन निर्णय दि. 11-10-2000 तसेच, तसेच पत्र क्रमांक 26-4-2004 अन्वये पहिली चार वर्षे कोणत्याही तुकड्यांना अनुदान मिळत नाही, पाचव्या वर्षी 20 टक्के , सहाव्या वर्षी 40 टक्के आणि नवव्या वर्षी 100 टक्क्यावर विनाअनुदानित तुकडी अनुदानावर येते. अमरावती विभागामध्ये काही तुकड्या 2004-05 मध्ये अनुदानावर आलेल्या आहेत. अकरावीची तुकडी जेव्हा अनुदानावर आली तेव्हा ती 40 टक्क्यावर आली. 20 टक्क्याचा टप्पा तर दिलाच नाही. माझा मघाशी हाच प्रश्न होता. 20 टक्के तर दिलेच नाही, 40 टक्के अनुदानावर आणलेले आहे. नियमानुसार 12 वीचा वर्ग हा 20 टक्के अनुदानावर यावयास पाहिजे होता, त्यांचेही अनुदान दिले नाही. आमचे असे म्हणणे आहे की, या तुकड्यांच्या सोबतच 31 मार्चपर्यन्त या सर्व तुकड्या तसेच सर्व जिल्ह्यातील तुकडयांना अनुदान देण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12891 (पुढे सुरु....

श्री.हसन मुश्रीफ : मी सांगितले की, एप्रिल अखेरपर्यन्त सर्वच तुकड्यांना अनुदान देणार आहोत.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावतीच्या बाबतीत जे टप्पे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते तपासून अन्याय दूर केला जाईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, अनुदान दिले जाईल असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. ते पूर्वलक्षी प्रभावाने देण्याची गरज आहे. कारण अन्याय केलेला आहे हे आपण मान्य केलेले आहे. त्या ठिकाणी निकष पूर्ण झाले असून सुध्दा अनुदान दिलेले नव्हते. स्वाभाविकपणे सभागृहाची आपल्याकडून अशी अपेक्षा आहे की, पूर्वलक्षी प्रभावाने ते अनुदान मिळाले पाहिजे. शासन ते करील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, थकबाकी देण्याची शासनाची योजना नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मला पॉइन्टेड प्रश्न असा विचारावयाचा आहे की, 12 वीच्या तुकड्यांच्या बाबतीत बुलढाणा आणि यवतमाळ जिल्ह्यातील तुकड्या अनुदानावर आणण्यासाठी आदेश प्राप्त झाले आणि अमरावती, अकोला व वाशीमसाठी तसे आदेश दिलेले नाहीत, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ते तपासून पाहिले जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझ्याकडे आदेशाची प्रत आहे. यामध्ये दोन जिल्ह्यांना द्यावयाचे आणि तीन जिल्ह्यांना द्यावयाचे नाही यामध्ये आवडनिवड करण्याची स्केलपट्टी दिलेली आहे काय ? असे होण्याचे कारण काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मघाशी मी सांगितले की, ते तपासून पाहिले जाईल आणि अन्याय झाला असेल तर तो दूर केला जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : त्याबाबत कार्यवाही केली जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्रीमती संजीवनी रायकर : या ठिकाणी अमरावती विभागाचा प्रश्न विचारलेला असला तरी माझ्याकडे सोलापूरची प्रकरणे आहेत. शासन सगळ्यांच्या बाबतीत विचार करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मघाशी मी सांगितले की, अनुदान दिले जाईल. सगळ्यांना ते दिले जाईल. यामध्ये चूक झाली असेल तर ती दुरुस्त केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D

चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील वजन मापक निरीक्षक यांनी वजनयंत्रे पंजीबंध्द करण्यासाठी लाच घेतल्याबाबत

(4) * 15737 श्री. धोंडीराम राठोड , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे , श्री. यशवंतराव गडाख , श्री. नतिकोद्दीन खतिब : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील वजन मापक निरीक्षक यांनी तीन इलेक्ट्रॉनिक वजन यंत्रे पंजीबध्द करण्यासाठी 450 रुपयांची लाच घेताना दिनांक 16 जानेवारी, 2006 रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, सदरहू वजन मापक निरीक्षक यांचेवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबा सिद्दीकी, श्री. सुनिल तटकरे यांच्याकरिता : (1) होय.

(2), (3) व (4) श्री.भि.भ.गायकवाड, निरीक्षक, वैधमापनशास्त्र यांना रु. 450 इतक्या रकमेची लाच मागून स्विकारताना ॲन्टी करप्शन ब्युरोने दिनांक 16.1.2006 रोजी पकडले व त्यांच्याविरुध्द चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती ग्रामीण पोलिस स्टेशन येथे गु.र.नं.क्र.3001/2006 कलम 7, 12, 13 (1) (ड) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, 1988 अन्वये नोंदविण्यात आला. त्या अनुषंगाने श्री. भि.भ.गायकवाड, निरीक्षक, वैधमापनशास्त्र यांना निलंबित केले आहे.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, वैधमापन निरीक्षक यांच्यावर गुन्हा दाखल केला असून त्यांना निलंबित केले आहे. यामध्ये एक प्रश्न असा निर्माण झालेला आहे की, हे वजन मापक निरीक्षक पैसे घेऊन खोटी वजन मापे पंजीबध्द करुन देण्याचा प्रयत्न करतात. आमच्याकडे कापूस खरेदी करणाऱ्या एका व्यापाऱ्यावर धाड टाकली असता 20 किलोची मणकी 21 किलो भरली. म्हणजेच जर एक क्विंटल कापूस खरेदी केला तर 105 किलो कापूस भरतो. अशी मणकी तयार करुन पंजीबध्द करुन देण्यात आली. खोटी वजने आणि मापे पंजीबध्द करुन देणारी जी यंत्रणा आहे त्यांच्याबाबतीत भविष्यामध्ये असे काही घडणार नाही यासाठी कडक उपाययोजना शासन करणार काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, इसके उपाय के तौर पर अब आर.बी. आय. चालान का उपयोग किया जाता है. इस तरह की मेजर अब हमने अडॉप्ट की है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D

ता. प्र. क्र. 15737 .....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ॲन्टी करप्शन ब्युरोकडून अमरावती कार्यालयात गेल्या वर्षभरात लाचलुचपत प्रतिबंधकाची किती प्रकरणे नोंदविण्यात आली आणि त्यापैकी एकूण किती प्रकरणांमध्ये संबंधितांना दोषी ठरविण्यात आले आणि त्यांच्यावर कारवाई झाली ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. नितीन गडकरी : एकाही प्रकरणामध्ये कारवाई झालेली नाही.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्रिमहोदय पटलावर काय ठेवणार आहेत ?

सभापती : सन्माननीय सदस्यांकडून असा प्रश्न विचारला गेला की, अशा पध्दतीने ॲन्टी करप्शनच्या धाडी किती झाल्या ? तुमच्या विभागाशी संबंधित असलेल्या किती धाडी झाल्या ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यभरामध्ये गेल्या वर्षभरात 2 निरीक्षक निलंबित झाले आणि 2 क्षेत्रीय .....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अशी उत्तरे येत असतील तर मग आम्ही राज्यपालांच्या परवानगीच्या संदर्भातील चर्चा सुरु करावयाची काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एका विभागाच्या बाबतीत प्रश्न विचारला. माझ्याकडे आता ती माहिती नाही. राज्यातील जी माहिती आहे.....

सभापती : हा प्रश्न वेगळा आहे असे उत्तर आपण देऊ शकता.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : वसई येथील पाचुबंदर याठिकाणी मी स्वत: धाड टाकली होती त्यावेळी प्रत्येक 10 किलोमागे 1 किलो 6 ग्रम वजन मारले जात असल्याचे आढळून आले. असे प्रकार होतात हे शासनाने मागील अधिवेशनामध्ये कबूल केले होते. वजन-मापे यामध्ये काही त्रुटी असतील किंवा लोकांना फसविले जात असेल तर संबंधित विभागाला कळवा असे रेडियोवरुन नेहमी सांगितले जाते. शासनाने अशा प्रकारे किती ठिकाणी धाडी टाकल्या आणि किती लोकांना शिक्षा केल्या ?

श्री. बाबा सिद्दीकी : सूपर्ण राज्यामध्ये 14669 इतके इन्स्पेक्शन्स केले. 17784 केसेस नोंदविल्या, 14619280 इतक्या कंपाऊण्ड कन्व्हिक्शन केसेस आहेत. 602 केसेस निकाली काढण्यात आल्या आणि 14064 केसेस प्रलंबित आहेत.

श्री. दिवाकर रावते : श्री. भि.म.गायकवाड, निरीक्षक वैधमानपशास्त्र यांची विभागीय चौकशी केली आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : माननीय सभापति महोदय, जब तक चार्जशीट फाइल नहीं होती तब तक .....

श्री. दिवाकर रावते : मी कारवाई बद्दल विचारत नाही. आपण श्री. गायकवाड यांची विभागीय चौकशी केली आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : श्री. गायकवाड याना निलंबित केले आहे.

श्री. दिवाकर रावते : विभागीय चौकशीमध्ये काही अधिकारी गुन्हेगार ठरलेले आहेत. म्हणून या प्रकरणी विभागीय चौकशी केलेली आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : याप्रकरणी विभागीय चौकशी सुरु करण्यात येईल.

ॲड. अनिल परब : विभागीय चौकशी केल्याशिवाय आरोपपत्र दाखल केले जात नाही.

सभापती : या प्रश्नाबाबत मंत्री महोदयानी उत्तर दिलेले आहे.

श्री. बाबा सिद्दीकी : विभागीय चौकशी तातडीने सुरु करण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड व ठाणे या जिल्ह्यासाठी शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय स्थापन होणेबाबत

(५) * १३०१७ श्री. रामनाथ मोते , डॉ. अशोक मोडक , श्रीमती संजीवनी रायकर : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर व ठाणे,रायगडसाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालकांची कार्यालये स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रस्तावातील लातुर येथे एसएससी बोर्ड व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय मंजुर झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड व ठाणे जिल्ह्यांसाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालक कार्यालय स्थापन करण्याबाबत नकारात्मक निर्णय घेण्यात आला हे खरे आहे काय असल्यास त्याची कारणे काय आहेत,

(४) वरील प्रश्न भाग (३) मधील जिल्ह्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय मान्य करण्याबाबत शासन फेरविचार करणार आहे काय वा त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ , प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (१) होय, लातूर व ठाणे, रायगडसाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालकांची कार्यालये स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यापैकी विभागीय शिक्षण उपसंचालक औरंगाबाद कार्यालयाचे विभाजन करुन लातूर या ठिकाणी शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.शिसंसा १०९९/(११०/९९)/प्रशा-५ दि.९-७-२००३ अन्वये नवीन शिक्षण उपसंचालक कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) होय, शासनाचे काटकसरीचे धोरण व नवीन पदनिर्मितीवरील बंदी तसेच राज्याचे मर्यादित आर्थिक स्त्रोत विचारात घेता आर्थिक भाराच्या व प्रशासकीय सोयीच्या दृष्टिकोनातून रायगड व ठाणे हे दोन जिल्हे बृहन्मुंबई शैक्षणिक विभागात समाविष्ट करणे अधिक योग्य असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) ठाणे व रायगड जिल्हे बृहन्मुंबई शैक्षणिक विभागास जोडल्यामुळे प्रशासकीय कामकाज सुरळीत सुरु असल्याने, सद्यस्थितीत ठाणे व रायगड जिल्हयासाठी स्वतंत्र शिक्षण उपसंचालक कार्यालय स्थापन करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

श्री. रामनाथ मोते : याठिकाणी रायगड व ठाणे जिल्हयासाठी शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय स्थापन होण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मुंबई विभागाला मुंबई, ठाणे आणि रायगड हे 3 जिल्हे जोडलेले आहेत. सध्या मुंबई विभागाला 3 जिल्हयातील जोडलेल्या प्राथमिक शाळांची जी संख्या आहे त्यापैकी रायगड आणि ठाणे जिल्हयातील प्राथमिक शाळांची संख्या 73407 असून माध्यमिक शाळांची संख्या 2964 आहे. ठाणे आणि रायगड जिल्हयातील 634 पैकी 306 उच्च माध्यमिक शाळा मुंबई विभागाला जोडलेल्या आहेत. वाढता कारभार विचारात घेता शासनाच्या धोरणाप्रमाणे त्या त्या भागासाठी शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय आणि

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एस.एस.सी.बोर्ड देण्याची तरतूद आहे. लातूर व ठाणे आणि रायगडसाठी स्ववंत्र शिक्षण उपसंचालकांची कार्यालये स्थापन करण्याचा शासनाचा प्रस्ताव असताना केवळ लातूरसाठी शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय मान्य केलेले आहे. ठाणे व रायगडसाठी शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय नाकारण्याची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : मुंबई, ठाणे आणि रायगड या 3 जिल्ह्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांची संख्या 11955 आहे. नाशिकमध्ये 14866, कोल्हापूरमध्ये 12902, औरंगाबादमध्ये 14630 याप्रमाणे माध्यमिक शाळांची संख्या आहे. ठाणे आणि रायगडमध्ये शाळांची संख्या कमी असल्यामुळे हा निर्णय घेतलेला आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1301.7 पुढे सुरु ..

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, ठाणे आणि रायगड जिल्हयासाठी शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय नसल्यामुळे शिक्षकांचे वैयक्तिक प्रश्न,शाळांचे प्रश्न सोडविणे अशक्य झालेले आहे. लातूर येथे शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय दिले तर ठाणे आणि रायगड या जिल्हयांसाठी शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय शासन का देत नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या जिल्हयांमध्ये शाळांची संख्या अजूनही कमी आहे. कामाचा व्याप वाढला तर भविष्यात उपसंचालकांचे कार्यालय देण्याबाबत विचार करण्यात येईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांच्या उत्तराकडे त्यांचेच लक्ष वेधतो. कोणत्या आधारावर प्रशासन सुरळितपणे चालू आहे असे मंत्रीमहोदय म्हणतात ? अनेक विद्यार्थ्यांचे,शिक्षकांचे,संस्थांचे प्रश्न प्रलंबित आहेत. ठाणे,रायगड आणि मुंबई या तीनही जिल्हयांना दावणीला बांधले आहे. शासनाने संख्यात्मक विचार करु नये. समस्या लक्षात घेतल्या पाहिजे. ठाणे जिल्हयाचे तर आता तीन जिल्हे करण्याची वेळ आलेली आहे. शिक्षणाधिकाऱ्यांचे कामाचे प्रेशर लक्षात घेता उपसंचालकांच्या कार्यालयाची निश्चितपणाने आवश्यकता आहे. लातूरला एसएससी बोर्ड आणि विभागीय शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय आहे. तसे ठाणे आणि रायगड या जिल्हयांसाठी न देता बृहन्मुंबईशी नाते जोडले आहे. या कामासाठी मुळातच उशीर झालेला आहे. शासनाने याबाबतीत निश्चित कालावधी ठरवून शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय सुरु करावे तरच शिक्षकांना आणि संस्था चालकांना न्याय मिळेल. तर शासन तशी कार्यवाही करील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्रत्येक उपसंचालकांच्या कार्यालयाच्या अखत्यारित 3/4 जिल्हे आहेत. मुंबईसाठी वेगळे करावे लागेल. एका जिल्हयासाठी एक करावे लागेल. लोकसंख्या जास्त आहे आणि विस्तारही मोठा आहे. भविष्यात याबाबत निश्चितपणाने निर्णय घेऊ.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईची लोकसंख्या किती आहे याची शासनाला कल्पना आहे. याबाबतीत सरकार निर्णय घेत नाही. आपण शासनाला निदेश द्यावेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबईचा विस्तार मोठा आहे. शाळांची संख्या कमी आहे. दबाव आणून उत्तर कसे देणार ?

सभापती : दबाव आणण्याचा प्रश्न नाही. तुमचे उत्तर तुम्हीच द्यावयाचे आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने जी माहिती पुढे आली त्यादृष्टीने बृहन्मुंबईच्या लोकसंख्येचा विचार केला तर तीन जिल्हे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ...

होतील. त्या व्यतिरिक्त ठाणे आणि रायगड हे जिल्हे आहेत. एकूण 5 जिल्हयांचा हिशोब करुन निर्णय घेता येईल.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आधीच स्पष्ट केल्याप्रमाणे भविष्यात तसा निर्णय घेता येईल. एक उपसंचालकाचे कार्यालय निर्माण करावयाचे झाले तर सहाय्यक संचालक,अधीक्षक अशा प्रकारची पदे निर्माण करावी लागतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रालयामध्ये पूर्वी एका खात्याला एक सचिव होता. कधी कधी दोन खात्यांना मिळून एक सचिव असे. आता प्रधान सचिव,सचिव त्यानंतर त्यांच्या हाताखाली सह सचिव आणि उपसचिव असे अनेक अधिकारी आहेत. शिक्षण क्षेत्राला पुढे न्यायचे असेल तर 2/4 अधिकारी नेमण्याबाबत शासन चालढकल का करीत आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पदे निर्माण करण्याचा विषय आहे. शासनाचे काटकसरीचे धोरण आहे. निश्चितपणाने या प्रस्तावाबाबत भविष्यात विचार करु.

सभापती : याबाबत शिक्षण विभागाची मानसिक तयारी आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : शिक्षण विभागाची यासंदर्भात मानसिक तयारी आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीकारी नाही

ता. प्र. क्र. 13017.....

सभापती : शिक्षण विभागाची मानसिक तयारी असेल तर त्या अनुषंगाने वित्त विभागाचे यासंदर्भात मत घ्यावे, असे मी माननीय मंत्री महोदयांना सुचवितो.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयाचा विस्तार फार मोठा आहे. त्या अनुषंगाने शासनाला त्यासंबंधी विचार करावा लागेल व तसा विचार करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड जिल्ह्यातील महाड औद्योगिक वसाहतीमधील श्रीहरी केमिकल या कंपनीत झालेली ॲसिड गळती

(6) * 13778 श्री. अनंत तरे , श्री. विलास अवचट , डॉ. दिपक सावंत : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यातील महाड औद्योगिक वसाहतीमधील श्रीहरी केमिकल या कंपनीत दिनांक 10 जानेवारी,2006 रोजीच्या सुमारास ॲसिडची गळती झाली हे खरे आहे काय,

(2) असल्यास उक्त गळतीची चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास उक्त चौकशीत किती कामगार मृत व किती कामगार जखमी झाल्याचे आढळून आले,

(4) सदर घटनेत मृत झालेल्या कामगाराच्या नातेवाईकांना व जखमी कामगारांना शासनाने कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे,

(5) अद्याप मदत वाटप केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाबा सिध्दीकी, श्री. गणेश नाईक यांच्याकरिता : (1) सदर कारखान्यात दिनांक 10 जानेवारी, 2006 रोजी रात्री 11.00 वाजता एच आयसोलेशन व्हेसलमधून सल्फ्युरीक ॲसिड उफाळून बाहेर पडण्याची घटना घडली, हे खरे आहे.

(2) होय.

(3) सदर घटनेत एकूण जखमी झालेल्या 6 कामगारांपैकी एक कामगार मृत पावला, तीन कामगारांना गंभीर जखमी व दोन कामगारांना किरकोळ जखमा झाल्या.

(4) व्यवस्थापनाने मृत कामगारांच्या वारसदारांकरिता (अ) मृताच्या नातेवाईकास रु. 7500/- त्वरित रोखीने मदत दिली आहे. (ब) नुकसान भरपाई रु. 2,09,920/- मा. आयुक्त नुकसान भरपाई, महाड, यांच्या न्यायालयात जमा केली आहे.

(क) त्यांचे वारसदारांना रु. 50,000/- सानुग्रह अनुदान म्हणून देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केले आहे.

चार जखमी कामगारांना प्रत्येकी रु. 4000/- ची आर्थिक मदत देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त प्रत्येक कामगारास उपचार होईपर्यतचा पूर्ण पगार दिला आहे व त्याच्या वैद्यकीय उपचाराचा संपूर्ण खर्च व्यवस्थापनाने केला आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील महाड औद्योगिक वसाहतीमधील श्रीहरी केमिकल या कंपनीत ॲसिडची गळती झाल्यामुळे एक कामगार मृत आणि 4 कामगार गंभीर जखमी झाले. अशाच प्रकारची गळती यापूर्वी देखील मार्च महिन्यात झाली होती व त्यामुळे सावित्री-गांधारी नदीत दूषित पाणी सोडल्याने नदीचे पाणी खराब झाले होते. माननीय श्री. नवाब मलिक हे कामगार मंत्री असतांना त्यांनी यासंदर्भात एक धोरण जाहीर केले होते. परंतु खात्याचा मंत्री बदल्यानंतर शासन अगोदरच्या मंत्र्यांनी ठरविलेल्या धोरणाची अंमलबजावणी करीत नाही काय ? तसेच यासंदर्भात शासन सेफ्टी फोर्स निर्माण करणार काय ? आणि एच आयसोलेशन व्हेसलमधून सल्फ्युरिक ॲसिड उफाळून बाहेर असे म्हटले आहे. याचा अर्थ त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठिकाणी ओव्हरफ्लो झालेला आहे व त्याबाबत निष्काळजीपणा झाला व वायुची गळती झालेली आहे. त्यासंदर्भात चौकशी करुन कोणती कारवाई केली आहे ? तसेच या अपघातामध्ये एक जण मृत्युमुखी पडला त्याला मदत जाहीर केली परंतु तीन कामगार गंभीर जखमी झालेले आहेत त्यांना फक्त 4000 रुपयेच मदत करण्यात आली. म्हणून गंभीर जखमी झालेल्या कामगारांना मदत वाढवून देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी: माननीय सभापति महोदय, माननीय सदस्य ने पहला जो प्रश्न किया है उसके उत्तर में मैं बताना चाहूंगा कि जो बात पहले मंत्री महोदय ने कही थी उसके संबंध में ड्राफ्ट बन रहा है और वह बिल जल्द ही शासन सदन में लाएगा. मैं एक बात और बताना चाहूंगा कि यह जो घटना हुई है यह स्पेंट एसिड की वजह से हुई है. यह एक तरह से वेस्टेज एसिड होता है. इसलिए ऐसी हिदायत दी गयी है कि इस स्पेंट एसिड को भी लेबोरेट्री में टेस्ट किया जाये ताकि इसमें इम्पयुरिटी न आने पाए और इस तरह की और दुर्घटना न हो.

डॉ. दीपक सावंत : महोदय या कंपनीने इंडस्ट्रीअल सेफ्टी नॉर्म्स यांचे पालन केले होते काय ? आणि महाडमधील या औद्योगिक वसाहतीमध्ये हा कायदा लागू झाला आहे काय ? तसेच या संपूर्ण फॅक्टरीचे इन्स्पेक्शन केले आहे काय ?

श्री. बाबा सिध्दीकी : महोदय, केवळ महाडचीच औद्योगिक वसाहत नाही तर संपूर्ण राज्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये पिरियॉडिकली इन्स्पेक्शन होत आहे. त्याप्रमाणे या फॅक्टरीचे देखील इन्स्पेक्शन झालेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : या फॅक्टरीचे इन्स्पेक्शन झालेले आहे काय ? या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या कारखान्याला फॅक्टरी इन्स्पेक्टरने कधी भेट दिली होती ? दुसरी गोष्ट म्हणजे मेडिकल इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरी यांनी केंव्हा भेट दिलेली आहे ? या फॅक्टरीमध्ये हा अपघात 16 जानेवारी रोजी घडला आणि त्यानंतर त्यामध्ये रात्री 11 वाजता 6 माणसे जखमी झाली. परंतु

प्रश्न असा निर्माण होतो की, जर तेथे पाईप बंद होता तर जेथे स्फोट झाला त्या ठिकाणी ती 6 माणसे कोणते काम करीत होती ? ज्याचा परिणाम एक कामगार मृत्युमुखी पडला व बाकी कामगार गंभीर जखमी झालेले आहेत, याचे स्पष्टीकरण मंत्री महोदय करतील काय ?

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, दिनांक 19.12.2005 रोजी इन्स्पेक्टरने भेट दिली होती. मैं बताना चाहूंगां कि उसमें इम्पयुरिटी आने की वजह से यह ओवरफ्लो हुआ है. वहां जो वर्कर्स बैठे हुए थे वे इसमें दुर्घटनाग्रस्त हुए हैं. वहां पर जो एसिड था उसमें इम्पयुरिटी आने की वजह से यह दुर्घटना हुई है. इसलिए अब यह निर्देश दिया गया है कि इस एसिड को लेबोरेट्री में चेक करके ही उसको यूज किया जाये.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. ॲसिड वापरण्यासाठी कंपनीने परवाना घेतला होता काय ? एच आयसोलेशन व्हेसलमधून सल्फ्युरीक ॲसिड उफाळून बाहेर पडल्यामुळे ही घटना घडली आहे. म्हणजे यात कंपनीची चूक आहे हे खरे आहे. तेव्हा याबाबत ज्यांनी निष्काळजीपणा केला आहे त्यांना जबाबदार धरून त्यांच्याविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. और मैं यह बताना चाहूंगा कि आय.पी.सी. सेक्शन 287,337,338,304(A) के तहत भी पुलिस ने कार्रवाई की है. साथ ही प्रशासन ने भी फॅक्ट्री एक्ट के सेक्शन 78 और 28 के अनुसार वहां पर कार्रवाई की है. इसका केस नंबर 155/2006 है.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे की, सल्फ्युरीक ॲसिडमध्ये इम्प्युरिटी असल्यामुळे अपघात झालेला आहे. रॉ सल्फ्युरीक ॲसिडच्या दोषामुळे हा अपघात घडला आहे की, फॅक्टरीच्या दोषामुळे सदर अपघात घडला आहे ? यात जर रॉ मटेरियलाचा दोष असेल तर संबंधित एजन्सीवर शासनाने कारवाई केली आहे काय ?

श्री.बाबा सिद्दीकी : माननीय सभापति महोदय, शासन ने ओनर पर कार्रवाई की है और पुलिस ने शिफ्ट इंजार्ज श्री सत्यनारायण पर कार्रवाई की है. यहां पर मैं यह भी बताना चाहूंगा कि यह जो रॉ मॅटेरियल रहता है यह गारबेज टाइप रहता है. इसलिए हमने निर्देश दिए हैं कि इस मॅटेरियल को टेस्ट किया जाये और इसमें इम्पयुरिटी हो तो बॉयलर में नहीं डाला जाये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, इम्प्युरिटीमुळे अपघात झाला असेल तर सल्फ्युरीक ॲसिडचा पुरवठा करणारी कंपनी कोणती होती ? त्या कंपनीविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ? महाड औद्योगिक वसाहतीतील प्रदूषित पाणी सावित्री नदीत सोडले जात असल्यामुळे तेथील मासेमारीचा धंदा बुडाला आहे. तसेच शेतीचे देखील उत्पादन बुडाले आहे. यासंबंधी शासनाने स्वत:हून सेफ्टी ऑडिट फोर्स स्थापन केला होता. त्यानुसार या भागाचे निरीक्षण करण्यात आले आहे काय ? असल्यास, सेफ्टी ऑडिट फोर्सने किती कारखान्यांचे निरीक्षण केले आहे व त्यापैकी किती कारखाने अवैधपणे प्रदूषित पाणी नदीत सोडत असल्याचे आढळून आले आहे ? व अशा कारखान्यांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी : माननीय सभापति महोदय, मैंने पहले ही बताया कि यह स्पेंट एसिड होता है. मैंने यह भी उत्तर दिया है कि एक ड्राफ्ट शासन की ओर से तैयार हो रहा है.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, शासनाने सेफ्टी ऑडिट फोर्स स्थापन केलेले आहे. या फोर्सने अद्यापपर्यंत किती कारखान्यांची पाहणी करून कागदपत्र तपासलेली आहेत ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, यासंबंधीचे उत्तर मी यापूर्वीच दिलेले आहे.

(यानंतर श्री बोर्डे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल-परवा जहाज उलटून लोक मृत्युमूखी पडल्याबाबतचा प्रश्न उपस्थित झाला होता. या घटनेमध्ये जे मृत्युमूखी पावले, त्यांना शासनाने एक-एक लाख रुपये नुकसान भरपाई दिल्याचे सांगण्यात आले. वास्तविक शासनाचा दोष नसताना सुध्दा नुकसान भरपाई दिली जाते ही वस्तुस्थिती आहे. उदा. एखाद्या भागात वीज पडून कोणी मृत्युमूखी पडला तर त्याला शासनाकडून नुकसान भरपाई दिली जाते. परंतु या ठिकाणी ज्या प्रश्नाबाबत चर्चा सुरु आहे त्या अपघातामध्ये ज्या व्यक्ती मृत पावल्या आहेत त्यांच्या वारसदारांना कारखानदाराने 50,000/- रुपये सानुग्रह अनुदान दिलेले आहे. परंतु जखमी झालेल्या व्यक्तींना शासनाने केवळ 4 हजार रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. अल्प मदत देऊन एकप्रकारे शासनाने जखमींची थट्टा केलेली आहे. त्यामुळे ही रक्कम वाढवून देण्याचा आग्रह धरुन, शासन ती रक्कम वाढवून देणार आहे काय ?

श्री.बाबा सिद्दीकी : माननीय सभापति महोदय, वर्कमॅन कॉम्पनसेशन एक्ट के तहत मॅनेजमेंट ने वहां पर 50 हजार रुपए एक्स-ग्रेसिया रकम दी है और 9 लाख, 39 हजार 827 रुपए उनके इलाज पर खर्च किया गया है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आदिवासी आश्रमशाळेतील उच्च माध्यमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबत

(७) * १३१०६ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. शांताराम करमळकर , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. रामदास तडस , श्री. वसंतराव खोटरे : तारांकित प्रश्न क्र.९३२० ला दिनांक ९ डिसेंबर,२००५ रोजी दिलेल्या दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागाच्या आश्रमशाळेतील उच्च माध्यमिक शिक्षकांना ७२२५-११०५० ची सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबत शासन स्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) अद्याप शासन स्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रवीशेठ पाटील, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (१) नाही.

(२) व (३) अद्याप कार्यवाही सुरु आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आदिवासी विभागाला न्याय मिळावा म्हणून आदिवासींसाठी सेप्रेट मंत्रालय देण्यात आले. परंतु त्यामुळे एकप्रकारे त्यांच्यावर अन्याय होत आहे असे वाटू लागले आहे. कारण सर्व विभागाच्या पंगती उठून जातात, परंतु आदिवासी विकास विभागाची पंगत मात्र बसतच नाही. शालेय शिक्षण विभागाने जी.आर.काढला, नगरविकास विभागाने नगर परिषदांच्या शाळांतील शिक्षकांसाठी जी.आर.काढला, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने एम.सी.व्ही.सी. साठी जी.आर. काढला, इतकेच नव्हेतर ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदांच्या शिक्षकांसाठी सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबतचा जी.आर.काढला. अशा प्रकारे चार पंगती उठून गेल्या, परंतु आदिवासी विभागाची पंगत मात्र बसलीच नाही. वास्तविक पाहता मागासलेल्या भागामध्ये काम करणाऱ्या लोकांना विशेष न्याय मिळावा म्हणून हा आदिवासी विकास विभाग निर्माण करण्यात आला. परंतु अद्यापपावेतो या आदिवासी आश्रमशाळेतील उच्च माध्यमिक शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे माझे प्रश्न असे आहेत की, आदिवासी विकास विभागाला निम्न दर्जाची वागणूक देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय ? नसल्यास, हे करेक्शन इश्यू करण्यामध्ये अडचण काय आहे ? जर अडचण नसेल तर, केव्हा इश्यू करणार आहात ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13106...

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, आदिवासींचा विकास करण्यासाठी आदिवासी विभाग निर्माण करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे पाचवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर, आदिवासी विभागांना ती वेतनश्रेणी लागू केली गेली. ही वेतनश्रेणी लागू केल्यानंतर सुरुवातीला आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षकांचा त्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला नाही. त्यामुळे आम्ही वित्त विभागाला कळविल्यानंतर वित्त विभागाने शिक्षण विभागाची मूळ नस्ती मागविली. ती नस्ती तपासल्यानंतर वित्त विभागाला त्यामध्ये काही भिन्नता आढळून आल्यामुळे त्यांनी आम्ही पाठविलेली नस्ती परत पाठविली. आमच्याकडून पुन्हा नस्ती पाठविण्यात आली आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कोणत्याही परिस्थित्ीत नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षकांना न्याय देऊ.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, कनिष्ठ महाविद्यालय ज्या ज्या विभागांत सुरु आहेत त्या सर्व विभागांना सुधारित वेतनश्रेणी देण्यात आली आहे. परंतु आदिवासी विभागांमध्ये काम करणाऱ्यांना ती दिली गेली नाही. ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत काम करणाऱ्या सर्वांना ही सुधारित वेतनश्रेणी दिलेली आहे. या प्रश्नातील शेवटच्या प्रश्नाला शासनाने असे उत्तर दिले आहे की, "अद्याप कार्यवाही सुरु आहे." म्हणून माझा नेमका प्रश्न आहे की, सुधारित वेतनश्रेणी देण्यासंदर्भातील कार्यवाही एका महिन्यात किंवा दोन महिन्यात पूर्ण होईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : महोदय, वित्त विभागाकडे नस्ती पाठविण्यात आली होती. त्यांना नस्तीमध्ये भिन्नता आढळून आल्यामुळे त्यांच्याकडून ती परत पाठविण्यात आली. त्यानंतर आम्ही वित्त विभागाकडे पुन्हा नस्ती पाठविली आहे. परंतु तरी सुध्दा मी पुन्हा सांगू इच्छितो की, नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षकांना न्याय दिला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी मा. अन्न नागरी पुरवठा मंत्री महोदयासोबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केलेली बैठक

(८) * १६५१२ श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अनंत तरे , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. विनोद तावडे , डॉ. अशोक मोडक , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. नितीन गडकरी , श्रीमती कांता नलावडे , डॉ. निलम गोऱ्हे : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १० फेब्रुवारी,२००६ रोजी वा त्यासुमारास ठाणे जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा आढावा घेण्याकरीता अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी एक बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेतली होती, त्याला जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदार, शिधावाटप नियंत्रक, अप्पर जिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी. इ. शासकीय अधिकारी उपस्थित होते, हे खरे आहे काय,

(२) ठाणे जिल्ह्यात ७०% होणारा रॉकेल पुरवठा ८०% वर नेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) तसेच ७० % केरोसिन पुरवठयाकरिता ३७३ टँकर ठाणे जिल्ह्यात पाठविले जात असल्याची शासकीय नोंद आहे, पंरतु प्रत्यक्षात ३१२ टँकर पाठविले जातात, ही बाब या बैठकीत उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,

(४) ३७३ टँकर पाठविले जातात, अशी नोंद असताना ३१२ टँकर प्रत्यक्षात पाठविले जातात तर उरलेले ६१ टँकर कोठे गायब होतात, ह्याचा शोध घेण्यात आला आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.बाबा सिद्दीकी, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनपत्र दिनांक ५ ऑगस्ट, २००५ ची अमंजबजावणी करुन शिधापत्रिकाधारकांना आश्वासीत केरोसीनाचा पुरवठा करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या हे खरे आहे.

(३) हे खरे नाही, शासनाकडून ठाणे जिल्ह्यास दरमहा ३७४४ कि.ली. (३१२ टॅकर) केरोसीनचा पुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एका-एका प्रश्नावर शासनाला हजारो रुपये खर्च येतो. मंत्रिमहोदय सुध्दा ब्रिफिंग घेतात. परंतु प्रश्नकर्ते सन्माननीय सदस्य मात्र प्रश्नाचा अभ्यास करुन येत नाहीत.

नंतर श्री.कांबळे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

शासनाकडून लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींना सवलती मिळणेबाबत

(९) * १३१७२ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून लोकशाहिर आण्णाभाऊ साठे यांच्या नावाने पुरस्कार दिला जातो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींना शासनाच्या काही सोयी सवलती मिळत नाहीत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत लवकर कार्यवाही न केल्यास हा पुरस्कार परत देण्याचा इशारा या पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी माहे डिसेंबर,२००५ च्या सुमारास दिला हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळुन आले व या पुरस्कार प्राप्त व्यक्तिना शासनाच्या सोयी सवलती देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) याबाबत शासनाने अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व ते केव्हा घेण्यात येईल ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : (१) होय.

(२) या पुरस्कार प्राप्त व्यक्तींना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे मोफत एस.टी.प्रवासाची सवलत अद्याप मिळाली नाही.

(३) होय.

(४) व (५) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासनाकडून लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींच्या, मोफत एस.टी. प्रवासाची सवलत, सरकारी विश्रामगृहांत राहण्यामध्ये सवलत व कार्यकारी दंडाधिकाऱ्याचा दर्जा अशाप्रकारच्या तीन मागण्या आहेत. सभापती महोदय, दलित मित्र पुरस्कार प्राप्त झालेल्या व्यक्तिप्रमाणेच लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेल्या व्यक्तिना सवलती देण्याबाबतचा माझा प्रश्न आहे. तरी, माननीय मंत्रीमहोदयांनी यावर असे उत्तर दिले आहे की, " मोफत एस.टी. प्रवासाची सवलत अद्याप मिळाली नाही, प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. " तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींच्या मागणीनुसार त्यांना या तिन्ही गोष्टींच्या सवलती देण्यासंदर्भात केव्हापर्यंत निर्णय घेण्यात येईल ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13172 ....

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, दलित मित्र पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींप्रमाणे लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेल्या व्यक्तिंना लवकरात लवकर मोफत एस.टी. प्रवासाची सवलत देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. मी या विषयासंदर्भात सिरिअस आहे. मी आपल्याला पुन्हा एकदा सांगतो, या संदर्भात तातडीने निर्णय घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्या लोकांना अद्याप मोफत एस.टी. प्रवासाची सवलत मिळालेली नाही. लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेले खूप कमी लोक आहेत. तरी, आपण त्यांना अशा सवलती दिल्या पाहिजेत.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मी या संदर्भात सिरिअस आहे. या संदर्भातील निर्णय तातडीने घेण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्त्यांना कोणत्याही प्रकारच्या सवलती मिळत नाहीत. तरी, माननीय मंत्रीमहोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मोफत एस.टी. प्रवास सवलत, सरकारी विश्रामगृहांत राहण्यामध्ये सवलत तसेच एस.ई.ओ. दर्जा या गोष्टी ज्याप्रमाणे दलित मित्र पुरस्कारप्राप्त व्यक्तिंना दिल्या जातात, त्याप्रमाणेच लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कारप्राप्त व्यक्तिंना ताबडतोब देण्याची व्यवस्था शासनातर्फे केली जाणार आहे का ? सभापती महोदय, या गोष्टीला तसा विलंब होता कामा नये, असे मला वाटते. या संदर्भात आपण सभागृहात घोषणा केली तर आम्ही त्याचे स्वागतच करु.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेल्यांना मोफत एस.टी. प्रवासाची सवलत मिळावी म्हणून आम्ही प्रस्ताव तयार केलेला होता. त्यावर या संदर्भात प्रत्येकी 7800 रुपये भरण्याबाबत परिवहन मंडळाने सूचना केल्या होत्या. त्यावर प्रत्येकी मिनिमम 7000 रुपये त्या विभागाला देण्याचे कबुल केले होते. त्यासंबंधीची नस्ती आम्ही वित्त विभागाकडे पाठविल्यानंतर वित्त विभागाने या संदर्भात क्वेरी काढून आम्हाला सांगितले की, ज्याप्रमाणे दलित मित्र पुरस्कार मिळालेल्या व्यक्तिंसंदर्भात एक हजार रुपये देण्यात येतात, त्याप्रमाणेच लोकशाहिर आण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळालेल्यांच्या बाबतीत करावे. सभापती महोदय, तरीसुध्दा आम्ही या संदर्भात परिवहन विभागाबरोबर चर्चा करुन लकवरात लवकर कार्यवाही करु.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2005 च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक 471 च्या पूर्ततेबाबतच्या कार्यवाहीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : आश्वासनाच्या कार्यवाहीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

श्री. रणजित कांबळे : (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2004 च्या पाचव्या अधिवेशनातील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार आश्वासन क्रमांक 66 च्या पूर्ततेबाबतची माहिती तसेच प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासन क्रमांक 72 च्या पूर्ततेबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : आश्वासनाच्या पूर्ततेबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा व वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2003-2004 व 2004-2005 चा सहावा व सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, 2006 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बाविआ-1005/प्र.क्र.28/2005 वित्त आयोग कक्ष, दिनांकित 13 फेब्रुवारी 2006 सभागृहसमोर ठेवतो.

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वार्षिक योजना 2006-2007 मध्ये पाटबंधारे विकासक्षेत्र व पाटबंधारे वगळून इतर विकासक्षेत्रासाठी उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययाच्या विभागनिहाय वाटपाबाबत माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेले निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशासंदर्भातील अनुपालन अहवालाबाबत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही आपणास सांगितले आहे की, माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशासंदर्भातील अनुपालन अहवाल आम्हाला अजून पर्यंत मिळालेला नाही. आपण या बाबीवर यापूर्वी सुध्दा निर्देश दिलेले आहेत. तत्कालीन राज्यमंत्री डॉ. राजेंद्र दर्डा हे अर्थ राज्यमंत्री म्हणून काम करीत असतांना सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेच्या अगोदर आम्हाला अनुपालन अहवाल मिळत नाही तर त्यावर आम्हाला बोलता येणार नाही. प्रत्यक्षात काय खर्च केला हे आमच्या लक्षात येत नाही, आपण बजेटमध्ये काय केले, हे आम्हला कळणार नाही, यासाठी आम्हाल अनुपालन अहवाल द्यावयास पाहिजे, दरवर्षी आपण आम्हाला अनुपालन अहवाल देता यावर्षी तो का देण्यात येत नाही. म्हणून हा अनुपालन अहवाल आम्हाला ताबडतोब देण्यात यावा ?

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, गेल्या 2-3 वर्षापासून सातत्याने या सभागृहामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा सुरु होण्याआधी राज्यपाल महोदयांनी जे निदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे काय तरतूद करण्यात आलेली आहे त्याचे विवरणपत्र दिलेले नाही. मागच्या वर्षी सुध्दा राज्यपाल महोदयांच्या निदेशांचे उल्लंघन केलेले होते. प्रत्यक्षात अंमलबजावणी काय होते याचे विवरणपत्र देण्यात येत नाही. माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशाकडे गेल्या 3 वर्षामध्ये मोठया प्रमाणात दुर्लक्ष करण्यात येत आहेत यापुढे हा प्रकार वाढत जाणार आहे असे दिसते. अंर्थसंकल्पावरील चर्चेच्या अगोदर अनुपालन अहवाल आम्हाला उपलब्ध करुन देण्यात यावा अशी आमची मागणी आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी जे निदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे जिल्हावार निधीचे कसे काय वाटप झालेले आहे, मागच्या वर्षी निदेशाप्रमाणे काय वाटप करण्यात आलेले होते, मागच्या वर्षी किती निधी मिळालेला आहे, यासंदर्भातील कंम्प्लायन्स् रिपोर्ट सभागृहामध्ये ठेवण्यात यावा तरच अर्थसंकल्पावरील चर्चा पुढे सुरु करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंदर्भात गेले दोन तीन वर्षे हेच चालले आहे. अर्थसंकल्प मांडला जातो व अनुपालन अहवाल दिला जात नाही. अर्थसंकल्पावरील चर्चा आज सुरु होणार आहे. आता सांगितल्याप्रमाणे अनुपालन अहवाल देणार आहात काय ? अनुपालन अहवाल दिल्याशिवाय

.....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

सभागृहामध्ये आमचे म्हणणे नीट मांडता येत नाही. खरे पाहिले तर माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश पाळले जात नाहीत, त्यांच्या निदेशाप्रमाणे पैसा मिळत नाही, अनुपाल अहवालाचे साधे कागद आम्हाला मिळत नाहीत. जोपर्यंत आम्हाला अनुपालन अहवाल मिळत नाही, तोपर्यंत अंदाजपत्रकावर चर्चा आम्ही कशी करायची ? मागील वर्षी सुध्दा याच कारणसाठी दोन दिवस सभागृहाचे कामकाज पुढे ढकलण्यात आले होते. शेवटी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी असे सांगितले की, माझ्या झेरॉक्स मशीनवर अनुपालन अहवालाच्या झेरॉक्स प्रती काढून त्या द्या. तरी सुध्दा अनुपालन अहवाल वेळेमध्ये देण्यात आलेला नाही. प्रत्येक वेळी सभापती महोदयांना निदेश द्यावे लागत आहेत. साधे कागद सुध्दा आम्हाला वेळेत देण्यात येत नाहीत. आता हे अतिशय असहय होत आहेत, आजच्या आज ताबडतोबीने हा अनुपालन अहवाल आम्हाला मिळाला पाहिजे.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्या एक बाब निदर्शनास आणू इच्छितो की, "Directives dated 6th March 2006 of the Hon'ble Governor of Maharashtra under clause 7 of The Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra Order, 1994 for the Annual Plan 2006-07" हे आम्हाला मिळाले. माननीय राज्यपालांनी डायरेक्शन्स दिल्यानंतर नियोजन विभागाने दोन पत्रे लिहिली. त्यानंतर ज्या हेडखाली जी तरतूद करण्यात आली होती ती सर्व व्हायोलेट करण्यात आली. अनुपालन अहवाल मिळल्याशिवाय आम्हाला काहीच माहिती समजू शकणार नाही. आपण आम्हाला एकीकडे सांगता की, आम्हाला 3000 कोटी मिळाले, परंतु प्रत्यक्षात आपण आम्हाला 500 कोटी रुपये देणार, 2500 कोटी रुपये देणारच नाही, पैसे देण्याचा नियम पाळणार नाही. म्हणून जो पर्यंत आम्हाला अनुपालन अहवाल मिळत नाही, ज्यामध्ये माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश, पुन्हा सरकारने नियोजन विभागाच्या माध्यमातून कॅबिनेटचा निर्णय ऐकून पत्राद्वारे केलेली विनंती म्हणजेच Directions changed by directions, अशाप्रकारे पत्राने डायरेक्शन्समध्ये बदल करता येत नाही. ही बाब मी आणि प्रा.बी.टी. देशमुख अनेक वेळेस सांगून थकलो आहोत. या संदर्भात आम्हाला कधी कधी असे वाटते की, या विषयावर काहीच बोलू नये. या ठिकाणी कागदपत्रे देण्यासाठी शासन महाग झाले आहे काय, विदर्भ, मराठवाडा, कोकण यांच्याबाबतची कागदपत्रे देण्यासाठी शासनाला एवढे जीवावर का येते ? ही कागदपत्रे मागण्यासाठी सुध्दा 4 वेळेस सभागृहाचे काम तहकूब करावयाचे, सभात्याग करावयाचा. याबाबतीत एक प्रथा आहे की, ज्यावेळी आम्ही हा विषय मांडला त्यावेळी माननीय सभापती यांनी निदेश दिला आहे की, ही कागदपत्रे ताबडतोब द्यावीत असे संकेत आहेत, प्रथा आहेत, परंपरा आहेत. सभापती महोदय, आपण आदेश दिल्यानंतर सुध्दा पूर्ण कागदपत्रे देत नसतील तर आपल्या पदाचा काय गरिमा राहिला ? दरवर्षी हा शो करायचा का, या गोष्टी किती वर्षे चालणार आहेत ? सभापती महोदय, आपण आदेश दिल्यानंतर सुध्दा कागदपत्रे मिळत नसतील तर हा आपला अवमान नाही का ? म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, याबाबत आपण शासनाला कडक निदेश द्यावेत. आपण आम्हाला संरक्षण द्यावे. मला याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर नको. याबाबतचे रेकॉर्ड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

अगोदरपासून तयार आहे. याबाबतीत आपण चेअरवरुन वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपण या सार्वभौम सभागृहाचे माननीय सभापती आहात, हा विषय केवळ आमच्याच नाही तर, आपल्या सुध्दा प्रतिष्ठेचा आहे. परंतु या ठिकाणी माननीय सभापतींनी दिलेल्या आदेशाचे सुध्दा शासनाकडून पालन होत नाही. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, आपले दिलेले आदेश न पाळल्याबद्दल आपण शासनाला कडक ताकीद द्यावी की, आज संध्याकाळपर्यंत अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु होण्यापूर्वी दरवर्षी आम्हाला जी कागदपत्रे मिळतात, ती सर्व कागदपत्रे आम्हाला त्वरीत मिळाली पाहिजेत. या बाबतीत गेल्या दोन वर्षांपासून व्हायोलेशन सुरु आहे, तिस-या वर्षी सुध्दा हेच सुरु आहे. अशाप्रकारे राज्य चालणार का ? अशाप्रकारे सभागृह चालणार आहे का, आपण दिलेल्या आदेशाची अशीच अवहेलना होत राहील काय, आम्ही दरवर्षी कागदपत्रे मिळण्यासाठी असेच भांडत रहायचे काय ? सभापती महोदय, या बाबतीत आपण निदेश दिले पाहिजेत व पुढील वर्षी असे झाल्यास माननीय अर्थमंत्र्यांना 15 मिनिटे बेंचवर उभे केले पाहिजे. या बाबतीतील धार अतिशय बोथट झाली आहे.

प्रा.बी.टी. देशमुख : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी आपले लक्ष वेधू इच्छितो. या सभागृहामध्ये काम कसे चालावे याबाबत आपणच निदेश द्यावयाचे आहेत. या संदर्भात आपण प्रत्येक वेळेस निदेश दिलेले आहेत. या संदर्भात माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश हे काही गुप्तधन नाही, ओळखा पाहू नाही. हे निदेश देशाच्या घटनेच्या कलम 371(2) अन्वये भारताच्या माननीय राष्ट्रपतींनी त्यांना असलेल्या अधिकारांचा वापर करुन दि.9 मार्च, 1994 रोजी महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांना जे आदेश दिले आहेत, त्या आदेशांचा वापर करुन माननीय राज्यपालांनी जे निदेश दिले आहेत त्याची अंमलबजावणीचे हे विषय आहेत. याबाबत या ठिकाणी एक बाब लक्षात आली आहे की, माननीय राज्यपालांच्या निदेशामध्ये पत्राने काही डेव्हीएशन आले आहेत. माननीय राज्यपालांच्या निदेशामध्ये पत्राने डेव्हीएशन्स करावीत का, हा वादाचा विषय आहे, याबाबतीत आम्ही आमचे विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. हा सर्व पत्रव्यवहारसुध्दा सभागृहासमोर ठेवणे अतिशय आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी. देशमुख .....

या निदेशाच्या बाबतीत डेव्हीएशन्सने काही विनंती करण्यात आली असेल, व त्याबाबतीत काही उत्तर आले असेल तर ते उत्तर सुध्दा जाणून घेण्याचा या सभागृहाला अधिकार आहे. आम्ही या संदर्भात कसे बदल केले, हे ओळखा पाहू, असे शासनाला आम्हा सदस्यांना सांगण्याचा काही अधिकार नाही. सभापती महोदय, मी या संदर्भात चार मुद्दांचा उल्लेख केला होता व हा पाचवा मुद्दा म्हणजे या बाबतीत आपल्याला डेव्हीएशन्ससाठी परवानगी देण्यात आली असेल किंवा त्याबाबतीत काही उत्तर आले असेल किंवा जो काही पत्रव्यवहार झालेला असेल, तो सर्व पत्रव्यवहार या सभागृहापुढे ठेवला पाहिजे. सभापती महोदय, मागासलेल्या भागांना तरतूदींचे वितरण होत असताना कायदेशीर कागदपत्रे सुध्दा या ठिकाणी दिली जात नाहीत, दरवर्षी ही कागदपत्रे मागावी लागतात, म्हणून आम्ही आपल्याकडे संरक्षण मागत आहोत. खरे म्हणजे दरवर्षी एवढया मोठया बॅगेमध्ये एवढे मोठे ओझे देतो, त्यामध्ये एखाद्या मागासलेल्या भागाचे एक लहानसे पुस्तक त्यामध्ये मिळाले असते...

(यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी.टी.देशमुख ....

मला स्वत:ला ही गोष्ट अत्यंत लाजीरवाणी वाटते. आज ही पाचही कागदपत्रे अंदाजपत्रकावरील चर्चा सुरू होण्यापूर्वी आम्हाला दिली जावीत असे स्पष्ट आदेश आपण द्यावेत आणि मागास भागाला आपण न्याय द्यावा अशी आमची आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नेमेचि येतो मग पावसाळा तसे आमच्या अर्थ खात्याचे झालेले आहे. घटनेने अंतर्भूत केलेल्या गोष्टी, माननीय राज्यपालांनी डायरेक्शन्स दिलेल्या असतना देखील आणि या सार्वभौम सभागृहामध्ये सांगून देखील परत परत यासाठी आम्हा सदस्यांना आग्रह धरावा लागत असेल तर त्याचा अर्थ असा होतो की, या राज्यकर्त्यांना घटनेचे काहीही सोयर-सुतक राहिलेले नाही. घटना ही पाळण्यासाठी असते, तिचा मान सन्मान आपण ठेवलाच पाहिजे ही भावना राज्यकर्त्यांमध्ये कमी झालेली आहे आणि आपण मंत्री होताना जी शपथ घेतो तिचे पावित्र्य व गांभीर्यच राज्यकर्त्यांना राहिलेले नाही. सभापती महोदय, गेली तीन वर्षे आम्ही पाहतो आहोत की, प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पावर चर्चा करण्यापूर्वी तसेच हे विधेयक येथे आले की, आम्ही अनुपालन अहवाल राज्यकर्त्यांकडे मागावयाचा आणि तरीही तो आम्हाला दिलेला नसतो. सभापती महोदय, आम्हा सदस्यांना एवढी मोठी बॅग भरून अर्थसंकल्पाची पुस्तके-प्रकाशने दिली जातात त्यामध्ये ही एक छोटीशी पुस्तिका दिली तर आम्हाला हा संघर्ष करण्याचीही गरज भासणार नाही. या संदर्भात येथे मागील वेळेस ॲडव्होकट जनरलना बोलाविले गेले आणि तरीपण पुन्हा तीच मागणी आम्हाला आजही करावी लागते आहे. सभापती महोदय, शेवटी आम्ही आपल्याकडेच अपेक्षेने पाहणार. आपल्याला यामध्ये एक मोठी आणि महत्त्वाची भूमिका बजावावयाची आहे. खरे म्हणजे आपण दिलेले आदेश सत्तारूढ पक्षाने मान्य करून त्याप्रमाणे वागले पाहिजे हा संकेत आहे, प्रथा आहे आणि नियम देखील आहे. पण तसे प्रत्यक्षात घडत नाही. सभापती महोदय, आज येथे अर्थसंकल्पावर चर्चा होणार आहे आणि अशा वेळेस आम्हाला ती चर्चा करण्याच्या दृष्टीने पाहिजे असलेली माहिती मिळत नसेल तर ही चर्चा आम्ही कशाच्या आधारे करायची ? ही माहिती असलेली कागदपत्रे आम्हाला चर्चेपूर्वी मिळत नसतील तर मग ही चर्चा करण्यात अर्थ तरी काय राहतो ? सत्तारूढ पक्षाला असे वाटत असेल तर येथे अर्थसंकल्प आणल्यानंतर 'होय चे बहुमत' 'होय चे बहुमत' करून आम्ही पास करायचा, विनियोजन विधेयक आल्यानतर ते देखील अशाच प्रकारे मंजूर करून टाकायचे., इतरही दुसरी कोणती गोष्ट सरकार पक्षाकडून आली तर त्यावर

..... पी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

देखील चर्चा न करता आहे तशीच मंजूर करावयाची तर ते योग्य नाही. आणि आम्ही येथे काही गडबड केली तर बाहेर राज्यकर्त्यांनी जाहीर करावयाचे की, विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये विरोधकांनी गोंधळ केला म्हणून कामकाज होऊ शकले नाही. मला वाटते हा विरोधकांचा अपमान केला जातो. पण विरोधक येथे का ओरडतात याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. आम्ही येथे इतर सर्व कामकाज करण्यास तयार आहोत. आमचा त्याला विरोध नाही. परंतु अर्थसंकल्पावर चर्चा करावयाची असेल तर त्यासाठी आवश्यक ती माहिती, आवश्यक ते कागदपत्रे आम्हाला मिळावित पण ती कागदपत्रे मिळू शकत नाहीत हे दुर्दैव आहे. आपण जे काही केले आहे ते प्रामाणिकपणे केले असेल तर मग माननीय राज्यपालांना आम्ही भेटल्यानंतर ज्या काही गोष्टी घडल्या आहेत त्याही जनतेसमोर आल्या पाहिजेत. सभापती महोदय, प्रश्न एवढाच आहे की, यामध्ये प्रामाणिकपणा कोठे आहे ? आणि या अर्थसंकल्पावर चर्चा करताना सदस्यांनी कोठले मुद्दे पाहून, कोठली परिस्थिती पाहून आपले विचार, आपले मुद्दे मांडावेत याचा आपणच विचार करावा. तेव्हा पूर्वसूचना देण्यासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे की, जोपर्यंत हे सर्व पेपर्स मिळत नाहीत, अनुपालन अहवाल मिळत नाही, तोपर्यंत आम्ही अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरूवात करणार नाही. तेव्हा सभापती महोदय, आपणच यातून मार्ग काढावा. या संबंधात संबंधितांना सूचना देऊन आम्हाला पाहिजे आहेत ती सर्व कागदपत्रे मिळतील अशी व्यवस्था आपण करावी एवढीच माझी या ठिकाणी आपल्याला विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षांतील सगळ्या घटना आपण आठवल्या तर आपल्या लक्षात येईल की, याच संबंधात आपण देखील काही भाष्य केलेले आहे. अनुपालन अहवाल द्यायचा की नाही यावर माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांनी काही गोष्टी सांगितल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख ज्या पद्धतीने येथे बोलले होते ते असह्य झाले म्हणूनच ते बोलले होते. आपण येथे निर्देश दिले की, अनुपालन अहवाल द्या, त्याशिवाय चर्चा होणार नाही. हा अहवाल सदस्यांना दिला पाहिजे ही घटनात्मक तरतूद आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... क्यू 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणे सरकारवर बंधनकारक आहे. तरीसुध्दा प्रत्येक वेळी आम्ही कागदपत्रे मागण्यासाठी उभे रहायचे, आपणास विनंती करावयाची आणि त्यानंतर आपण सरकारला आदेश द्यावयाचे. आपण दिलेल्या आदेशाचे शासनाकडून पालन न झाल्यामुळे आपल्याला अपमानीत व्हावे लागते. आम्ही पहिल्या वर्षी,दुसऱ्या वर्षी, तिसऱ्या वर्षी व चौथ्या वर्षी वारंवार विनंती करीत आलो आहोत. तेव्हा या सभागृहाचे कामकाज आता आपण थांबवावे. कारण सभागृहाचे कामकाज करण्याची आमची मनस्थिती नाही. शासनाकडून वारंवार घटना पायदळी तुडविली जात आहे. घटनेप्रमाणे सभागृहाचे कामकाज होत नसेल आणि एवढया बेदरकारपणे हे सरकार वागत असेल तर कुणी तरी या सरकारला घटनात्मकदृष्टया त्यांची असलेली जबाबदारी सांगण्याची आवश्यकता आहे. आणि म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण सु-मोटो हे सभागृह तहकूब करण्याचा निर्णय घ्यावा आणि अनुपालन अहवालाच्या प्रती पंधरा मिनिटामध्ये किंवा अर्ध्या तासामध्ये सभागृहाला उपलब्ध करुन द्याव्यात अशाप्रकारचे निदेश शासनाला द्यावेत. नाही तर आम्ही या सभागृहामध्ये अपमानीत होऊन बसायचे व या शासनाला सारख्या विनवण्या करीत रहायचे ही दुर्भाग्याची गोष्ट आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, लवकरात लवकर अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सभापती : मंत्रिमहोदय, लवकरात लवकर याचा अर्थ अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी आपण अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवणार काय?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, संबंधित मंत्रिमहोदय नसल्यामुळे उद्या अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा पॉईंट ऑफ इन्फर्मेशनचा विषय आहे, हा आमच्या अधिकाराचा प्रश्न आहे. आपण आपल्या आसनावरुन सरकारला आदेश दिले आहेत.आणि त्यानुसार आम्ही सरकारकडे अनुपालन अहवाल मागत आहोत. आम्हाला सरकारची सहानुभूती नको, सरकारची कृपा नको, फेव्हरीझम नको. हे सरकार आम्हाला कागदपत्रे देऊन आमच्यावर उपकार करीत नाही. या सभागृहामध्ये ज्यावेळी हा मुद्दा उपस्थित करण्यात आला त्यावेळी माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी युक्तिवाद केला की, हे कॉन्फिडेन्शिअल डॉक्युमेंट असल्यामुळे ते कसे द्यायचे? त्यावेळी त्यांनी पुष्कळ आढेवेढे घेतले. या सभागृहामध्ये दोन दिवस चर्चा झाली व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

त्यानंतर चेअरवरुन आपण आदेश दिले ते आदेश एका वर्षासाठी नव्हते तर ते नेहमीसाठी होते. त्या आदेशाप्रमाणे तो अनुपालन अहवाल आपण आमच्या बजेटच्या पुस्तकांमध्ये टाकायला हवा होता, बॅगमध्ये टाकावयास हवा होता तो टाकला नाही. सभापती महोदय, प्रश्न आमचा नाही तर आपला आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण सहनशील आहात, सृजनशील आहात, आपला कुणीही अपमान केला तरी आपण मोठया मनाचे आहात. परंतु आपला झालेला अपमान आम्हा सदस्यांना सहन होत नाही. म्हणून आपण ताबडतोब कडक शब्दामध्ये निदेश दिले पाहिजेत. या बाबतीत चार वर्षापासून सरकारची चालढकल चालली आहे. ही कागदपत्रे आम्हाला न मिळाल्यामुळे आम्ही नियम 93 ची सूचना दिली. म्हणून या बाबतीत आपण सरकारला कडक शब्दामध्ये निदेश दिले पाहिजेत अशी माझी आपणास विनंती आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एकीकडे शासनाकडून माननीय राज्यपालांचे हुमिलेशन करीत असतांना माननीय सभापतींनी दिलेल्या आदेशाबाबत सुध्दा तशाप्रकारची वागणूक मिळणे अत्यंत आक्षेपार्ह आहे. आपण सातत्याने तीन वर्षे आदेश दिले आहेत. सभापती महोदय, मी आणखी एक गंभीर मुद्दा याठिकाणी मांडतो की, बजेट डॉक्युमेंट मिळाल्यानंतर निदान सात दिवसांच्या कालावधीनंतर त्यावर चर्चा सुरु झाली पाहिजे अशी नियमामध्ये तरतूद आहे. हे डॉक्युमेंट बजेटचा भाग नाही असे आपल्याला म्हणावयाचे आहे कां? माननीय राज्यपालांना कचऱ्याच्या टोपलीत टाकून देण्याची आपली भाषा आम्ही समजतो. माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशाप्रमाणे हे शासन बजेटबरोबर अनुपालन अहवालाची प्रत देत नाही. भारतीय संविधानानुसार या देशातील फक्त या एका राज्यामध्ये घटनेने विशेष व्यवस्था केली आहे. आणि ही कागदपत्रे त्या व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. याबाबतीत सभापती महोदय, आपण निर्णय दिलेला आहे. These are important budget documents त्यामुळे तांत्रिकदृष्टया कोणत्याही प्रकारचे रिलॅक्सेशन यामध्ये देता येणार नाही असे स्पष्टपणे सांगितले आहे. कागदपत्रे दिल्यानंतर नियमाप्रमाणे सात दिवसांची मुदत दिली पाहिजे अशाप्रकारचे आदेश आपण शासनाला द्यावेत अशी मी विनंती करीन.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरु....

ही नियमाचा भंग करणारी आक्षेपार्ह कृती म्हणून डिक्लेअर करावी अशी मागास भागाच्या वतीने मी विनंती करतो.

श्री.आर.आर.पाटील : अनुपालन अहवाल मंत्रीमहोदयांकडून लवकरात लवकर दिला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सात दिवसाचा तरी वेळ द्या, एवढा तरी न्याय करा.

श्री.आर.आर.पाटील : मी सांगितले की, मंत्री महोदयांकडून लवकरात लवकर कागद दिले जातील.

प्रा.बी.टी.देशमुख : आठ दिवसांनी ठेवला तरी चालेल, परंतु पुढे सात दिवसाची मुदत द्यावी. कृपा करुन उशिरात उशिरा अनुपालन अहवाल ठेवावा, तो ठेवल्यानंतर नियमाप्रमाणे सात दिवसाची मुदत आम्हाला द्यावी.

सभापती : माननीय मंत्री आर.आर.पाटील साहेब आपल्याला काही सांगायचे आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : मी सांगितलेले आहे.

सभापती : मी माझा निर्णय देतो.

डॉ.अशोक मोडक : निर्णय देण्यापूर्वी माझी विनंती आहे. सभापती महोदय, मी आपल्याला या संबंधातील डायरेक्टीव्हज वाचून दाखवितो. मुळामध्ये अनुपालन देण्यास उशीर झालेला आहे. आठ दिवसाचा अवधी आपण मागता तो किती गैर आहे, ते मी सांगतो. I will read para 1.3 of the directives. It is stated that "According to Rule 8 of the said Order, the allocation of funds or outlays made by the Governor shall be reflected in the Annual Financial Statement to be placed before the State Legislature..."

माझे म्हणणे असे आहे की, अगोदरच विलंब केलेला आहे. आणखी का विलंब करता ? विलंबाबाबत दिलगिरी व्यक्त करावी. सरकार सभागृहाच्या भावना समजून घेत नाही, असे माझे म्हणणे आहे.

डॉ.सुनील देशमुख : सन्माननीय विरोधी पक्ष नेते, श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपले विचार मांडले. तीन-चार वर्षापासून सातत्याने याबाबत प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रत्येक वेळेला विधान परिषद थांबवून या संबंधाने डायरेक्टीव्हज दिलेल्या आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर (बसून) : तरीही त्याबाबतची काळजी घेतली जात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सन्माननीय सभापती महोदय, अत्यंत दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, अधिकाऱ्यांना 8 दिवसापूर्वी मी सांगितले होते.

श्री.मधुकर सरपोतदार : हे शब्द आपण मागे घेतले पाहिजेत.

...(अडथळा)...

श्री.नितीन गडकरी : विदर्भातील मंत्र्यांचे आदेश अधिकारी पाळायला तयार नाहीत, काय अवस्था आहे ?

डॉ.सुनील देशमुख : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु होईल त्या पूर्वी हे कागद सर्व सदस्यांना देण्याची व्यवस्था होईल.

सभापती : आता मी माझा निर्णय देतो. सन्माननीय विरोधी पक्ष नेते पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.दिवाकर रावते, त्याचबरोबर सन्माननीय उप मुख्यमंत्री आर.आर.पाटील, वित्त राज्यमंत्री श्री.सुनील देशमुख यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने आपली मते मांडली. सातत्याने तीन-चार वर्षे या अनुपालन अहवालाच्या बाबतीत सदस्यांनी लक्ष वेधल्यानंतर त्याबाबतच्या कागदपत्रांची पूर्तता केली जाते, ही पध्दती टाळण्याची आवश्यकता आहे. शासनाला माझी सूचना राहील की, आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस सुरुवात होण्यापूर्वी अनुपालन अहवाल उपलब्ध झाला तर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस सुरुवात होईल.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. सभापती .....

या अनुषंगाने शासनाने त्याची पूर्तता करावी असे मी आपल्याला निदेश देत आहे. या पुढच्या काळामध्ये असे कधीही घडणार नाही याची दक्षता शासनाने घेण्याची गरज आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेपूर्वी सर्व कागदपत्रे पटलावर ठेवण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपण निदेश दिले त्याच्याही आधी दोन तीन दिवसांपासून हा विषय सुरु आहे. आम्ही सभागृहात चार दिवसांपूर्वी विषय उपस्थित केले हे आपल्यालाही माहीत आहे. या ठिकाणी भावना व्यक्त करीत असताना मला अतिशय वाईट वाटते. या सरकारमध्ये काय सुरु आहे ? मी ज्यावेळी नियम 93 अन्वये सूचना दिली त्याचवेळी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी विभागाला सूचना दिल्या की, ही कागदपत्रे ताबडतोब दिली पाहिजेत. त्यांनी तसे आदेश दिले तरी सुध्दा विभागाचे अधिकारी त्यांचे आदेश पाळत नाहीत हे यातून सिध्द झालेले आहे. आपण दिलेले आदेश ते पाळत नाहीत. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी दिलेले आदेश पाळत नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आदेश पाळत नाहीत. माननीय राज्यपालांचे आदेश पाळत नाहीत. मग ते कोणाचे आदेश पाळतात ? सभापती महोदय, लोकशाहीच्या दृष्टीने, भारतीय घटनेच्या अनुषंगाने आपण या गंभीर गोष्टीची नोंद घेण्याची गरज आहे. मी पुन्हा पुन्हा आपल्याला विनंती करतो. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावत आहे. सभापती महोदय, आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. आपण सुसंस्कृत आहात, सहिष्णू आहात, मोठ्या मनाचे आहात. आमच्या हातून एखादी चूक झाली तर आपण उदार अंत:करणाने माफ करता. तीन वर्षापासून सतत अशा प्रकारे व्हायोलशन होत आहे. 4 दिवसांपूर्वी उपस्थित केलेल्या मुद्याच्या बाबतीत आज माननीय अर्थ राज्यमंत्री सांगत आहेत की, मी आदेश देऊनही अधिकारी कागदपत्रे देत नाहीत. याची आम्ही गांभीर्याने नोंद घेतली. परंतु या सभागृहाच्या प्रतिष्ठेकरिता आपण याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील या सभागृहात उपस्थित आहेत. मी अशी मागणी करतो की, ही अतिशय गंभीर बाब आहे त्यामुळे त्यांनी शासनातर्फे दिलगिरी व्यक्त करावी. हा आपला आणि या सभागृहाचा अवमान आहे. आमच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

अधिकाराचा अवमान आहे. नाही तर तुमचा अवमान केला हे चांगले केले, योग्य केले, तुम्ही भांडत राहा त्यानंतर कागदपत्रे देऊ असे त्यांनी सांगावे. आम्ही घटनेप्रमाणे शपथ घेतो पण घटना पाळत नाही, बाहेर गेल्यानंतर शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतो पण या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटना पाळत नाही हे आपण सांगावे. त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी. ही गोष्ट सरकारला शोभणारी नाही. हा घटनेचा अवमान आहे. याबाबतीत काही संवेदना असेल तर सरकारची भूमिका काय आहे हे त्यांनी सांगावे. सभापती महोदय, आपण याबाबतीत निदेश दिले पाहिजेत. सभापती महोदय, हे योग्य झाले काय ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला त्याबाबतीत मी माझे मत मांडत आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी औचित्याच्या माध्यमातून आपला मुद्दा मांडला तसेच सन्माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी त्यांचे विचार मांडत असताना त्यांची असणारी अडचण या ठिकाणी विशद करण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना मी सांगेन की, त्यांनी जी अडचण या ठिकाणी सांगितली त्या अडचणीच्या अनुषंगाने सुध्दा आपण नोंद घ्यावी. असे काही घडले असेल तर ते कोणत्या परिस्थितीत झाले ? या सार्वभौम सभागृहाच्या अनुषंगाने असे कधीही घडता कामा नये यादृष्टीने सुध्दा आपण याचा गांभीर्याने विचार करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, याची गांभीर्याने दखल घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे बरोबर आहे काय ? माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, त्यांच्याकडून आम्हाला अपेक्षा आहेत. ही बाब योग्य आहे की अयोग्य आहे हे त्यांनी सांगावे. राज्यमंत्र्यांनी सांगितले तरी कागदपत्रे मिळत नाहीत.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हा अनुपालन अहवाल सभागृहासमोर मांडण्यासाठी उशीर का झाला याची सुध्दा माहिती घेईन. अशी त्रुटी पुन्हा राहणार नाही याची शासनामार्फत दक्षता घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मंत्रिमहोदयांनी दिलेले आदेश पाळले गेले नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले की, मी आदेश देऊनही अधिकाऱ्यांनी ऐकले नाही. याबाबतीत माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांचे काय म्हणणे आहे ? आपले अर्थ राज्यमंत्री सांगत आहेत की, मी आदेश देऊनही अधिकाऱ्यांनी ऐकले नाही म्हणून कागदपत्रे सभागृहासमोर ठेवता आली नाहीत.

श्री. आर. आर. पाटील : कोणत्या अधिकाऱ्यांनी त्यांचे आदेश पाळलेले नाहीत याची मी चौकशी करीन. अशा अधिकाऱ्यावर काय कारवाई करावयाची याचा शासन विचार करील.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहाचे संकेत असे आहेत की, जेव्हा एखादा माननीय सदस्य किंवा माननीय मंत्री महोदय या सभागृहासमोर माहिती देतात तेव्हा ती सत्य आहे असे गृहीत धरण्यात येते. माननीय वित्त राज्यमंत्री डॉ. सुनील देखमुख हे 4 दिवसापासून सांगत आहेत. ते या सदनामध्ये चुकीची माहिती देणार नाहीत. डॉ. सुनील देखमुख हे काँग्रेस पक्षातील असल्यामुळे आपली भूमिका अशा प्रकारची आहे की नाही, ते मला माहीत नाही. ज्याप्रमाणे हे सभागृह एक आहे त्याप्रमाणे मंत्रिमंडळ एक आहे. माननीय उपमुख्यमंत्री हे या सभागृहाचे नेते आहेत. याबाबतीत वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देखमुख यांनी सत्य परिस्थिती सभागृहासमोर सांगितली. याबाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त करावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. याबाबतीत या सभागृहाचा अवमान झालेला आहे. माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशांचा अवमान झालेला आहे. असे असताना माननीय उपमुख्यमंत्र्यांसारखे सुसंस्कृत नेते दिलगिरी व्यक्त करायला तयार होत नाहीत, आणि "माहिती तपासतो आणि चौकशी करतो" असे सांगतात, हे इष्ट नाही.

सभापती : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आपली अडचण या ठिकाणी सांगितली आहे ...

श्री. मधुकर सरपोतदार : एक गोष्ट निर्विवाद आहे.... सगळया घटना घडत आहेत...

सभापती : माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे...

श्री. मधुकर सरपोतदार : ...हे म्हणतात चौकशी करतो. ही कोणती पध्दती आहे ? हे योग्य आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, केवळ मोठ्याने बोलून माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा माननीय सदस्यांनी धरणे योग्य नाही. याबाबतीत मी सांगितले की, काही अडचणी आहेत. सूचना दिल्यानंतरही अहवाल तयार झालेला नाही. सभापती महोदय, सर्वसाधारण चर्चेच्या आधी हा अनुपालन अहवाल सभागृहामध्ये देण्यात येईल असे निदेश आपण दिले होते. म्हणून याबाबतीत मी स्वत: लक्ष घालून अशा अधिका-यांवर काय कारवाई करायची ते आम्ही ठरवू.

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे. आपण आम्हाला न्याय दिलात. आमचे म्हणणे चूक असेल तर ते खोडून टाकावे. याबाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर बरोबर नाही, समाधानकारक नाही.....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिल्यानंतर ते काहीही बोलणार काय ? नियमाप्रमाणे हे सभागृह चालणार आहे काय ?

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदय एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मागच्या वेळी माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे प्रश्न विचारत असताना त्यांनी आपले ऐकले नाही म्हणून त्यांना सक्त ताकीद देण्यात आली. आता माननीय सदस्यांना आपण बसण्यास सांगत असताना सुध्दा ते बसत नाहीत. तेव्हा त्यांनाही आपण सक्त ताकीद द्यावयास पाहिजे.

(दोन्ही बाजूचे माननीय सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : सर्व माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे. प्रत्येक माननीय सदस्याला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. मी जास्तीत जास्त माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देत असतो.

श्री. आर.आर.पाटील : या सभागृहाचा डेकोरेम ठेवला गेला पाहिजे. माननीय सदस्यांना केवळ मोठ्याने बोलता येते याचा अर्थ सरकारचा आणि आमचा आवाज लहान आहे असे समजण्याचे कारण नाही. माननीय सदस्य हे कोण्त्या अनुशेषाबद्दल बोलत आहेत ? अनुशेष कमी करण्याचे काम लोकशाही आघाडी सरकारने केले आहे. या अनुशेषाच्या पापाचे बाप हे युती शासन आहे. युती शासनाच्या काळात महामंडळे काढण्यात आली, कृष्णा खो-यातील पाणी अडविण्यासाठी प्रोजेक्ट सुरु करण्यात आले. युती शासनाच्या काळात अनुशेष वाढला.

...नंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

अनुशेषाबद्दल फक्त प्रा.बी.टी.देशमुख यांना बोलण्याचा अधिकार आहे. आपण अनुशेषाबद्दल काय बोलणार ?

सभापती : सभागृहातील वातावरण लक्षात घेता मी सभागृहाचे कामकाज 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 3.40 ते 4.00 पर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहात अर्थसंकल्प मांडल्यानंतर घटनेच्या आर्टिकल 371 (2) अन्वये माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार शासनाने अनुशेषाच्या संदर्भात जे निवेदन करायला पाहिजे होते ते वेळेवर केले नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्या निमित्ताने या सभागृहात सभागृहाची प्रतिष्ठा कमी होईल अशा प्रकारचे वातावरण येथे निर्माण झाले आहे. या निमित्ताने आपल्या माध्यमातून मी शासनाला अशी विनंती करु इच्छितो की, युतीचे शासन ज्यावेळी सन 1995 मध्ये सत्तेवर आले, त्यानंतर सन 1997 मध्ये बॅकलॉग इंडिकेटर समितीचा अहवाल तत्कालीन शासनाकडे दाखल झाला. या शासनाच्या कालावधीत सुमारे साडेचार वर्षाच्या काळात विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये एकूण किती बॅकलॉग निर्माण झाल ? त्यानंतर सन 1999 पासून आतापर्यंत विदर्भ तसेच मराठवाडयात हा बॅकलॉग किती आहे व तो कशा प्रकारे काढण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात आला यासंबंधीची माहिती सभागृहाला मंत्री महोदयांनी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, या सभागृहाचे कामकाज थोडया वेळापूर्वी स्थगित करण्यात आले होते. तत्पूर्वी माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देत असतांना सांगितले की, अधिकारी माझे ऐकत नाहीत. माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे ज्या आविर्भावात बोलले त्या अनुषंगाने त्यांनी जी प्रतिक्रिया व्यक्त केली आणि त्यानंतर सभागृहाचे नेते तसेच माननीय उपमुख्यमंत्री यांनी सांगितले की, जे अधिकारी यामध्ये दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. यानंतर हा प्रश्न वास्तविक संपवायला पाहिजे होता परंतु तसा तो संपविला नसून पुन्हा लांबविण्यात आला व त्यामुळे सभागृहाचे काम बंद करावे लागले त्याबद्दल त्यांनी सभागृहाची माफी मागायला पाहिजे. अनेक वेळा आपण देखील त्यांना वेळोवेळी खाली बसण्याची सूचना दिली असता ते खाली बसले नाहीत, म्हणून त्यांना आपण समज द्यावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला फक्त खुलास करावयाचा आहे. ज्या सन्माननीय सदस्यांना सभापती महोदय आपण वारंवार समज देतात ते सन्माननीय सभासद 'समज देणे' यावर प्रवचन करीत आहे, हे ऐकून मला आनंद झाला. सभापती महोदय, आमचा बाप सभागृहात काढला आहे. 'तुमच्या बापाचे बाप आहोत' असे उद्गार येथे काढण्यात आले आहे. आमचा बाप काढण्याचा अधिकार शासनाला नाही. अनुशेषासंबंधी चर्चा करावयाची असेल तर ती सुध्दा करण्याची आमची तयारी आहे. सभापती महोदय, तीन वर्षापासून आपण शासनाला निदेश देत आहोत..... (अडथळा) .... सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आम्ही ऐकले आहे. तेव्हा आता माझेसुध्दा म्हणणे त्यांनी ऐकले पाहिजे.

श्री.गरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, यात पापाचा धनी विरोधी पक्षच आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी 'पापाचे बाप' असे उद्गार काढले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचा बाप काढलेला नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, '.....याला तुम्हीच जबाबदार आहेत, आम्ही बापाचे बाप आहोत.' असे उद्गार सन्माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी काढले आहेत. येथे आमच्या बापाचा डायरेक्ट किंवा इनडायरेक्ट उल्लेख करण्याची आवश्यकता नाही. (अडथळा) ... तुमचे आगाऊ अतिउत्साही सैनिक आहेत.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

मी काय चुकीचे बोललो आहे ? मी आता वापरलेला शब्द असंसदीय नाही. वाटल्यास पुस्तक काढून पहावे. (गोंधळ)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, आपले म्हणणे ऐकणाऱ्यांपैकी मी एक आहे. तेव्हा आपण खाली बसावे. ..... (गोंधळ)....

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी व्यक्तिगतरित्या या सभागृहात कोणाच्याही बापाबद्दल बोलणे शक्य नाही. खरे म्हणजे राज्यामध्ये जो अनुशेष वाढला आहे तो अनुशेष वाढण्याच्या पापाचे बाप युती सरकार होते. मी जे बोलत आहे त्यामध्ये चूक असेल तर..... आज राज्यामध्ये अनुशेष वाढला, तो गोंडसदार झाला, मोठा झाला, त्याचे अपत्य आपण आहात. याबाबत श्वेतपत्रिका काढली जाईल. अनुशेषाबद्दल बोलावयाचा अधिकार असेल तर तो सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना आहे, लोकशाही आघाडीच्या आमदारांना आहे. परंतु या अनुशेषाबद्दल बोलण्याचा आपणांस अधिकार नाही. पुजाऱ्याने जेवढे नारळे फोडले नसतील, तेवढे आपण फोडले आहेत. युती सरकारला कॉन्ट्रॅक्ट वाटण्याची घाईच झाली होती. त्यावेळी तुमचेच सरकार महामंडळ काढत बसले होते. महाराष्ट्रातील कॉन्ट्रॅक्टर संपले, शिवाय आंध्र प्रदेशातील सुध्दा संपले.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी.....

श्री.नितीन गडकरी : महोदय, आपण जर मला बोलू द्यावयाचे नाही असे ठरविले असेल तर, मला सभागृहाच्या बाहेर काढून द्या.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, असे हेत्वारोप आपल्यासारख्या सदस्यांकडून करणे योग्य नाही.

श्री.नितीन गडकरी : महोदय, मला जो मुद्दा मांडावयाचा होता तो मुद्दा मी अजून मांडलेलाच नाही.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून
"आगाऊ" शब्दप्रयोग मागे घेण्याबाबत आग्रह धरतात.)

श्री.नितीन गडकरी : महोदय, संसदीय कार्यप्रणालीच्या नियमानुसार "आगाऊ" हा शब्द जर असंसदीय असेल तर तो मागे घेण्यास मी तयार आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कृपया आपण खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी : महोदय, या सभागृहात युती सरकारच्या काळात मी सुध्दा मंत्री म्हणून कार्यरत होतो. युती सरकारने अनुशेष वाढविला असे माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले. सन्माननीय आर.आर.पाटील यांनी जे शब्द वापरले त्याबद्दल मी त्यांना उदार अंत:करणाने माफ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

करतो. ते शब्द रेकॉर्डवरुन काढा असे मी म्हणत नाही. आताच माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी अनुशेषासंदर्भात श्वेतपत्रिका काढतो असे सांगितले आहे. मी त्यांना सांगेन की, त्यांनी जरुर श्वेतपत्रिका काढावी. परंतु मला सदनाला सांगितले पाहिजे की, गेल्या तीन वर्षांपासून आपण दिलेले आदेश या शासनाकडून पाळले जात नाहीत. मग अशा परिस्थितीत आम्ही काय करावयाचे ?

सभापती : मी यासंदर्भात निदेश दिले होते. अनुपालन अहवाल.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी माझ्या बाबतीत जो आरोप केला त्याबाबत मी आता खुलासा करीत आहे. मी म्हटले होते की, "जर हे ऐकत नसतील तर त्यांना बेंचवर उभे राहण्याची शिक्षा द्या." महोदय, या शब्दांपासून मी मागे हटत नाही. संसदीय कार्यप्रणालीच्या नियमानुसार जर मी बोललेले शब्द असंसदीय असतील तर पुस्तक पाहून आपण तपासा. जर ते असंसदीय असतील तर मी जरुर मागे घेईन. परंतु "बाप" वगैरे असा शब्द वापरणे योग्य नाही.

या ठिकाणी सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी "या पापाचे बाप तुम्ही आहात" असे माझ्यासमोर येऊन म्हटलेले आहे. खरे म्हणजे या चर्चेत मला स्वारस्य नाही. मी वापरलेले शब्द असंसदीय नाहीत. माय लर्नेड आणि संसंस्कृत मंत्री महोदयांनी चुकून, In force or in the course of the speaking.. जरी या ठिकाणी आमचे "बाप" काढले असतील तरी त्यांना उदार अंत:करणाने माफ करण्यास मी तयार आहे. कारण यामुळे त्यांची प्रतिमा चांगली होणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : अनुपालन अहवालाच्या या गंभीर विषयासंदर्भात मी माझे निदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी विचारलेल्या औचित्याच्या प्रश्नासंबंधी माननीय वित्त राज्यमंत्र्यांना जर काही माहिती असेल तर त्यांनी सांगण्याचा प्रयत्न करावा आणि माहिती नसेल तर, त्यांनी ती माहिती नंतर पटलावर ठेवावी.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेला विषय सत्य आहे. सभापती महोदय, विदर्भाचा आणि मराठवाड्याचा अनुशेष युतीच्या शासनाच्या काळातच वाढला. त्यानंतर हा अनुशेष भरुन काढण्याचा.... सभापती महोदय, मला सांगायला आनंद होतो की, या वर्षी म्हणजे सन 2005-2006 मध्ये, विदर्भामध्ये इरिगेशनवर सर्वात जास्त म्हणजे एक हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे रेकॉर्डवर आणलेच आहे तर आपण मला बोलू द्यावे. त्यांना या संदर्भात कोणी विचारलेले नाही.

(गोंधळ)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी विचारलेल्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदय बोलत आहेत. मी त्यांना बोलायला अनुमती दिली होती.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या विषयावर श्वेतपत्रिका काढा. दूध का दूध, पानी का पानी होऊ द्या. सन 1984 पासून कोणाच्या काळात किती अनुशेष काढण्यात आला हे आपण देखील पाहू. सभापती महोदय, यावर चर्चा करण्यास आम्ही तयार आहोत. अब खून से खून लढ़ेगा. लढो, फरक क्या पडता है ? हम इसके लिए तैयार है. सभापती महोदय, या विषयावर चर्चा कबूल करावी, आम्ही चर्चा करायला तयार आहोत.

सभापती : सभागृहामध्ये अत्यंत महत्वाच्या विषयावर एक तास चर्चा चालली आहे. संपूर्ण विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या भागांमध्ये असलेला अनुशेष तातडीने दूर व्हावा हीच त्या चर्चेपाठीमागची पोटतिडकीची भावना होती. या चर्चेच्या अनुषंगाने बोलत असताना, जर एखाद्याकडून वेगळा शब्द गेला असेल तर तो पाहून कामकाजातून काढून टाकण्याची व्यवस्था करण्यात येईल. आता आपल्यापुढे नियम 93 अन्वयेच्या सूचना आहेत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्या विषयावर आज चर्चा करायची होती, त्यासंदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. आज अनुपालन अहवालाकरिता आम्हाला एक तास विनाकारण गमवावा लागला. शुक्रवारी या सभागृहामध्ये मी एक मुद्दा उपस्थित केला होता. त्यामुळे सभागृहाचे कामकाजही स्थगित झाले होते. सभापती महोदय, तो मुद्दा असा होता की, " 4701 मोठे व मध्यम पाटबंधारे " या पुरवणी मागणीमध्ये 1041 कोटी रुपये पाटबंधारे खात्यासाठी आलेले आहेत. सभापती महोदय, 1041 कोटी रुपयांसंदर्भात मी त्यावेळी घटनात्मक तरतूद देखील वाचून दाखविली होती. या संदर्भात पहिल्यांदा माननीय राज्यपाल महोदयांनी निदेश दिले. माननीय राज्यपालांनी निदेश दिल्यानंतर प्लॅनिंग विभागाचे सचिव श्री. शंकरन यांनी दोन पत्रे लिहिली. त्यांनी इरिगेशनकरिता 4600 कोटी रुपयांची प्रोव्हिजन करायला सांगितली होती. परंतु आपण 1941 कोटी रुपयेच देऊ शकतो असे सांगितले. त्यावर मग त्यांनी ह्या 1941 कोटी रुपयांचे डिस्ट्रीब्युशन कसे करावे, याबाबत सांगितले. आपण डायरेक्टिव्हज् रिलॅक्स केले. सभापती महोदय, सरकारने त्यावेळी सांगितले की, आमच्याकडे पैसे नाहीत. आता 3100 कोटी रुपये इरिगेशनवर खर्च झालेले आहेत. इरिगेशनसाठी बजेटमध्ये 1941 रुपये असताना 3100 कोटी रुपये खर्च कसे झाले ? असा पहिला हरकतीचा मुद्दा मी उपस्थित केला होता. सभापती महोदय, माझा दुसरा हरकतीचा मुद्दा असा होता की, आपण एक्सेस केलेल्या 1041 कोटी रुपयांसंदर्भात माननीय राज्यपालांना ताबडतोब इन्टिमेट केले पाहिजे होते. या संदर्भात कायदा व नियम आहे. आपण माननीय राज्यपालांना काही इन्टीमेट केले नाही. नंतर माननीय राज्यपालांना इन्टीमेट केल्यानंतर त्यांनी आपल्याला 1041 कोटी रुपये डिस्ट्रीब्युट करण्यासंदर्भात काही सांगितले आहे का ?

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

श्री. नितीन गडकरी....

याचाच अर्थ यामध्ये घटनेच्या कलम 371 (2) अन्वये माननीय राज्यपालांना जे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे त्या अधिकारांचेच उल्लंघन झालेले आहे. मे व ऑगस्ट 1994 मध्ये वैधानिक विकास महामंडळाची स्थापना झाल्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांनी कायदेशीर तरतूद केली होती. त्याप्रमाणे दोन्ही सभागृहाने ते बिल मंजूर करुन त्या बिलाचे कायद्यात रुपांतर करण्यात आलेले आहे. प्रतिवर्षी अनुशेषाच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी जे निदेश दिलेले आहेत त्यांचे पालन होत नाही, यासंदर्भातील खुलासा शासन करीत नाही. त्यामुळे या अनुषंगानेच मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी 1041 कोटी रुपये, माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे वाटप करावे असे फाईलवर आदेश दिले होते. परवा हा मुद्दा मी सदनात उपस्थित केला होता, तेव्हा त्या अनुषंगाने येथे असेही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते की, श्री. गडकरी यांनी सांगितलेली माहिती खरी आहे काय ? श्री. गडकरी यांनी फाईल बघितली आहे काय ? मी असे सांगू इच्छितो की, या सभागृहामध्ये बोलतांना मी पूर्ण खात्रीने व योग्य अशी माहिती घेतल्याशिवाय बोलत नाही. या विषयावर सभागृहात मी सांगितले की, 1041 कोटी रुपयांच्या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी राज्यपाल महोदयांच्या निदेशाप्रमाणे त्या रकमेचे वाटप करण्यात यावे, असे फाईलवर लिहीलेले नाही असे कोणत्याही मंत्री महोदयांनी सांगितले तर त्यावर विश्वास ठेवून मी सभागृहाची माफी मागण्यास तयार आहे, त्यासंदर्भात दिलगिरी व्यक्त करण्याची माझी तयारी आहे. ही फाईल कोठे आहे अशी मी विचारणा केली तेव्हा असे सांगण्यात आले की, मुख्यमंत्री महोदय दिल्लीला गेलेले आहेत, मुख्यमंत्री जरी दिल्लीला गेले असले तरी ते फाईल घेऊन जात नाहीत. ती फाईल कोणाची आहे अशी विचारणा करण्यात आली तेव्हा अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी असे सांगितले की, बहुधा ही फाईल इरिगेशन विभागाची असावी. ही फाईल जर पाटबंधारे विभागाची असेल तर येथे पाटबंधारे राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख उपस्थित होते पण आता ते उपस्थित दिसत नाही. तरी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील उपस्थित आहेत, ते या संदर्भात माहिती सांगतील, त्यांचा लौकिक असा आहे की, ते खरे बोलतात, असत्य बोलत ...

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

नाहीत, असंसदीय बोलणे त्यांना आवडत नाही, त्यांची प्रतिमा वेगळी आहे, नियमाप्रमाणे ते बोलण्यास कचरत नाहीत. या प्रकरणामध्ये मी असे सांगितल्यानंतर माझे म्हणणे जर असत्य असेल तर मी सभागृहाची क्षमा मागण्यास तयार आहे. माझी चूक असेल तर मी ती कबूल करण्यास तयार आहे. म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी फाईलवर असे लिहिलेले नाही, या बाबीसंबंधीचा कृपया सभागृहात खुलासा करावा. माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश पाळले जात नाहीत, माननीय मुख्यमंत्री महोदयांचे ओदश पाळले जात नाहीत, राज्य विधानमंडळाचे नियम कोणी पाळत नाहीत, अशी ही प्रभावी शक्ती कोण आहे ? ही सुप्त शक्ती कोण आहे ? असे हे सुपर मुख्यमंत्री कोण आहेत ? माझे तरुण मित्र व माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील, यांनी जरी सांगितले की, असे फाईलवर लिहीलेले नाही तरी मी दिलगिरी व्यक्त करीन, फक्त या विषयावर सरकारने खुलासा करावयास पाहिजे. माझी सभापती महोदयांकडे मागणी आहे की, परवा या सभागृहामध्ये विनियोजन विधेयक कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आले होते, यासंदर्भातील बातम्या आम्ही वर्तमानपत्रामध्ये ऐकतो आहोत, माननीय राज्यपाल महोदयांना शिष्टमंडळ रात्री भेटावयास गेले, असे आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचतो. यासाठी एक शिष्टमंडळ नियुक्त केलेले आहे. या राज्यामध्ये घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. विनियोजन विधेयक मार्च अखेर पर्यंत मंजूर झाले नाही तर या ठिकाणी सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार मिळणार नाहीत, मंत्र्यांच्या गाडीमध्ये पेट्रोल, डिझेल टाकता येणार नाही. विरोधी पक्षाचे सदस्य काहीही बोलतात, असे म्हटल्ये जाते, जर आमची माहिती असत्य असेल तर त्याचे सरकारने उत्तर दिले पाहिजे. माझी आपल्याला विनंती आहे की, मी येथे जे 5-6 मुद्दे मांडलेले आहेत त्यामध्ये There is a violation of the provisions of the Constitution. There is a violation of Hon. Governor's directions. There is a violation of directions of Hon. Chief Minister. There is a violation of the law which is passed by the Legislative Assembly and Legislative Council. हे 5 ते 6 मुद्दे मी violation च्या संदर्भात सांगितलेले आहेत. माननीय मंत्री महोदय जेव्हा शपथ घेतात तेव्हा असे म्हणतात की, भारतीय घटनेला स्मरुन मी शपथ घेतो की,.....

यानंतर श्री. सांगळे...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

"मी घटनेने दिलेल्या अधिकारांचे पालन करीन," परंतु सभापती महोदय, या ठिकाणी आपण आम्हाला संरक्षण द्यावे. या पाचही प्रकरणांमध्ये घटनेची पायमल्ली झाली आहे. मी या संदर्भात काल माननीय राष्ट्रपतींना सुध्दा पत्र लिहिले आहे. जेव्हा राज्य शासन घटनेची पायमल्ली करते, व याबाबत ज्यावेळी गृह विभागाचा अहवाल मिळतो त्यावेळी घटनेची पायमल्ली झाल्यामुळे सरकार बरखास्त करता येते. या बाबतीत मी काही मेंबर्स ऑफ पार्लियामेंटरी यांना सांगितले की, या ठिकाणी गेल्या तीन वर्षांपासून जे काही सुरु आहे हे घटनेप्रमाणे आहे किंवा नाही, याबाबत आपण लोकसभेत विचारणा करावी. याबाबतीत सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख व प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सुध्दा सांगितले की, ज्यावेळी ते माननीय प्रधानमंत्री यांना भेटले त्यावेळी माननीय प्रधानमंत्री यांनी ही बाब गंभीर असल्याचे त्यांना सांगितले. यावर त्यांनी याबाबत चौकशी करतो व आपल्याला निर्णय कळवतो असे सांगितले. परंतु माननीय पंतप्रधान यांच्या निर्णयाला वेळ लागेल असे सांगण्यात आले. म्हणून आमचा गोंधळ सुरु आहे. आम्ही आपल्याकडे वैधानिक मुद्दावर आदेश मागतो. स्वाभाविकपणे या सर्व विषयांवर " कोणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे " याबाबतीत आपण कशाला उत्तर द्यावे, आपली इन्स्टिटयुशन लेजिस्लेटीव्ह असेंब्ली, कौन्सिल आहे. परंतु आम्हाला याबाबतीत इन्स्टिटयुशनकडून काही खुलासा होत नाही, मार्गदर्शन मिळत नाहीत, या संदर्भात आपल्या काही मर्यादा आहेत, काही अडचणी आहेत. परंतु याबाबत शासनाकडे खुलासा मागितल्यास शासनाकडून सुध्दा कोणताही खुलासा केला जात नाही. सभापती महोदय, या सभागृहाचे सदस्य म्हणून काय प्रॅक्टीस आहे, हे मी आपल्या नजरेसमोर आणू इच्छितो. लोकसभेमध्ये पार्लियामेंटरी फक्शंनरीज म्हणून मे.कौल व शकधर यांचे एक पुस्तक आहे, हे पुस्तक विधीमंडळाच्या व राज्यसभेच्या नियमांची गीता मानली जाते. त्यात असे नमूद केलेले आहे की, केंद्र शासनासाठी ज्याप्रकारे ॲटर्नी जनरल असतो व त्याचप्रमाणे राज्य शासनासाठी ॲडव्होकेट जनरल असतो. केंद्र शासनासाठी ॲटर्नी जनरलचे असलेले अधिकार, कर्तव्य व जबाबदा-या ज्याप्रमाणे केंद्र शासनासाठी पक्क्या केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्य शासनासाठी ॲडव्होकेट जनरलचे असलेले अधिकार, कर्तव्य व जबाबदा-या, राज्य शासनासाठी पक्क्या केलेल्या आहेत. मे.कौल व शकधर या पुस्तकातील पान क्र.143 वर "The position is that the

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

Attorney-General may attend the House on his own, at the request of the Government, on a motion passed by the House or in response to a request by the Speaker if he wishes to here him on any matter before the House" असे नमूद केलेले आहे. सभापती महोदय, अशावेळी आम्ही मोशन देऊन किंवा सरकारने बोलवून किंवा आमच्या विनंतीनुसार आपण त्यांना बोलवल्यास ॲटर्नी जनरल या ठिकाणी येतात. ॲटर्नी जनरलच्या बाबतीत मे.कौल व शकधर यांनी असे नमूद केलेले आहे की, "The Attorney-General is not member of Parliament or of the Council of Ministers. He has, however, the right to speak in, and otherwise to take part in the proceedings of either House, any joint sittings of the Houses and any Committee of Parliament of which he may be named a member, but he can not vote. He is entitled to all the privileges and immunities of members of Parliament and when present in the House occupies a seat on the Government Benches " सभागृहामध्ये ॲडव्होकेट जनरल आले की, ते समोरच्या बाजूला बसतात, इकडच्या बाजूला बसत नाहीत. या संदर्भात ॲडव्होकेट जनरलच्या बाबतीत या ठिकाणी स्पष्टपणे लिहिलेले आहे की, "In order to help Lok Sabha and the Speaker to decide issues with reference to Legislative proposals before the House, the Attorney-General has on occasion addressed the House at the suggestions of the Speaker or of the House and given his opinion on the legal and Constitutional aspects of the matters before the House. " याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, प्रॅक्टीस व प्रोसिजर ऑफ पार्लियामेंट या संदर्भात ॲडव्होकेट जनरलच्या बाबतीत असलेले तीनही नियम मी सभागृहाला वाचून दाखवले आहेत. प्रॅक्टीस अशी आहे की, ज्यावेळी आपण पार्लियामेंटमध्ये विधीमंडळाचे कामकाज केले जाते, त्यावेळी केंद्र सरकारच्या ज्या नियम व पध्दती असतात त्याच्यांशी रिलेटेड ज्या नियम व पध्दती आहेत त्यानुसार आपण या ठिकाणी काम करीत असतो. तसेच ज्या ज्यावेळी सभागृहामध्ये घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होतात त्यावेळी केंद्र शासनासाठी ॲटर्नी जनरल यांचे मत घेतले जाते आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ...

राज्य शासनासाठी ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतले जाते. माझे लर्नेड मित्र ॲड गुरुनाथ कुलकर्णी हे माझ्या युक्तिवादाशी सहमत असतील असे मला वाटते. परंतु मजबुरी असल्यामुळे कधी कधी त्यांची अडचण होत असेल, त्यामुळे सहनही होत नाही व सांगता येत नाही अशी त्यांची परिस्थिती आहे. परंतु त्यांच्या न्यायप्रियतेला मी दाद देतो. या संदर्भात मी प्रा.बी.टी. देशमुख यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी मी व आपण मिळून पुनर्विनियोजन विधेयकाला दुरुस्ती आणली होती. त्यावेळी या मंगल कार्यासाठी ॲड गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी हातभार लावला होता. याबद्दल त्यांना त्यांच्या पक्षाच्या अध्यक्षांची देखील नाराजी पत्करावी लागली होती.

(यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

परंतु कोकणच्या हितासाठी त्यांनी हे धाडस दाखविले. ...

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, त्यावेळी मी जी भूमिका येथे मांडली होती तीच भूमिका माझ्या पक्षानेही मान्य केली आहे हे मला येथे आवर्जून सांगावयाचे आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. आता मी येथे वर्तमानपत्रातील दाखले देत नाही. पण त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारे चर्चा आलेली आहे. माननीय मुख्यमंत्री, राज्यमंत्री माननीय राज्यपालांना भेटावयास गेलेले आहेत. जे विनियोजन विधेयक आपल्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आले होते ते आता कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेले नाही. ते मागे घेतले असल्याचे खालच्या सभागृहामध्ये सांगितले गेले. तेव्हा या सर्व मुद्यांबाबत गंभीर असा पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, सरकारच्या पेचप्रसंगाशी माझा संबंध नाही. तसे पाहिल्यास मी देखील कायद्याचा पदवीधर आहे पण मी आमचे मित्र माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांच्या सारखी वकिलीची प्रॅक्टीस सुरू केलेली नाही. तेव्हा या सदनाचा एक सदस्य म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, मी मघापासून या ठिकाणी जे पाच मुद्दे मांडले आहेत ते घटनात्मक आहेत की नाही ? हे आपण सांगावे, तसेच ते कायद्याच्या चौकटीत बसतात की नाही ? घटनचे व्हायोलेशन यामध्ये झालेले आहे की नाही ? माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतर देखील त्यांच्या सूचना, आदेश पाळले जात नाहीत तर ते योग्य आहे की अयोग्य आहे ? सभापती महोदय, केंद्र सरकारचे प्रधानमंत्री आणि राज्यातील मुख्यमंत्री हे तसे सारखेच आहेत. विधीमंडळामध्ये ज्या पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाचे सदस्य त्यांच्यातील एकाला आपला नेता म्हणून निवडतात आणि मग तो विधीमंडळ पक्षाचा नेता माननीय राज्यपालांकडे जाऊन सांगतो की, माझ्या पक्षाला बहुमत मिळालेले आहे आणि माझा पक्षाला सरकार बनविण्यास आपण मला आमंत्रित करावे. त्याप्रमाणे आपल्या आघाडीला येथे बहुमत मिळाल्यानंतर सन्माननीय श्री.विलासराव देशमुख माननीय राज्यपालांकडे गेले होते आणि त्यांनी आपल्या पक्षाला सरकार बनविण्यासाठी आमंत्रित करावे अशी विनंती राज्यपालांना केली हाती त्यावेळी माननीय श्री.आर.आर.पाटील हेही त्यांच्याबरोबर होते. तेव्हा ही सगळी प्रक्रिया घटनेप्रमाणे होते. इतकेच काय पण या सभागृहामध्ये असलेला लाल रंग, खालच्या सदनाचा हिरवा रंग देखील नियमाप्रमाणे आहे. तसेच माननीय राज्यपाला येथे आल्यानंतर त्यांच्या

..... बीबी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

स्वागताला कोण उभे राहणार आहे, त्यांच्या मागे कोण असणार आहे, त्यांच्या बाजूला कोण असणार आहे वगैरे सगळ्या गोष्टी घटनेप्रमाणे केल्या जातात. थोडक्यात सांगावयाचे तर हे सभागृह कायदेमंडळ आहे आणि या सभागृहाचा परपज हा आहे की, We are the law maker institution म्हणजे हे कायदे बनविणारे सभागृह आहे. त्यामुळे या सभागृहाचे सदस्य म्हणून आम्ही, मी या ठिकाणी घटनेच्या आधीन राहून जे पाच निरनिराळे मुद्दे उपस्थित केले आहेत त्याबाबत येथे खुलासा झाला पाहिजे. सभापती महोदय, या सगळ्याच प्रश्नांची, मुद्यांची उत्तरे आपणच दिली पाहिजेत असा आग्रह धरणे बरोबर होणार नाही. म्हणून विनंती आहे की, याबाबतीत मी जी माहिती सभागृहाला दिली, मग ती माननीय मुख्यमंत्र्यांच्या रिमार्क्सबद्दल असेल, ती योग्य आहे की नाही याबद्दल खुलासा येथे झाला पाहिजे. जर मी म्हणतो तसे नसेल तर मी येथे दिलगिरी व्यक्त करण्यास तयार आहे. तसेच अन्य जे 3-4 वैधानिम मुद्दे मी येथे उपस्थित केलेले आहेत, या सभागृहातील सर्वच सदस्यांना मग तो कोठल्याही पक्षाचा सदस्य असो, या सभागृहामध्ये काम करताना आमच्या मनामध्ये काही गोष्टीं बाबत, विशेषत: कामकाजाच्या नियमांच्या बाबतीत गोंधळ उडतो आणि त्याबाबत समाधानकारक खुलासा होऊ शकत नसेल त्यावेळी भारताच्या घटनेमध्ये तरतूद केलेली आहे की, जर पार्लमेंटमध्ये अशा प्रसंग आल्यास तेथे ॲटर्नी जनरल यांना बोलावून घेऊन त्याबाबत खुलासा करून घेता येऊ शकेल आणि राज्याच्या विधानमंडळामध्ये असा प्रसंग उद्‌भवल्यास ॲडव्होकेट जनरल यांना बोलावून घेऊन खुलासा करून घेता येऊ शकेल. सभापती महोदय, मी गेले 3-4 दिवस प्रयत्न केले पण एक सदस्य म्हणून माझे समाधान झाले नाही आणि मला वाटते आमचे लर्नेड मित्र सन्माननीय श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांचे देखील समाधान झाले नसावे. म्हणून येथे ॲडव्होकेट जनरल यांना बोलावून काही गोष्टींचा खुलासा करून घेणे अगत्याचे आहे. कारण we try to understand what is a difference between letter & spirit. पण घटनेचे स्पिरीट वेगळे आहे आणि लेटर वेगळे आहे. अर्थात हे असे होणे लोकशाहीसाठी आवश्यक आहे. तेव्हा विनंती आहे की, मी येथे ज्या बाबत खुलासा मागितला आहे तो सरकारने करावा. सभापती महोदय, येथे काहींना मी अशा प्रकारे वैधानिक मुद्दे उपस्थित करीत असल्याचे आवडत नसेल पण तरीही ते मुद्दे येथे मांडणे मला आवश्यक वाटते. आपण मी येथे उपस्थित केलेल्या 4-5 मुद्यांवर निर्णय द्यावा अशी मी गेले 4-5 दिवस सातत्याने मागणी करतो आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ....

अशोधित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

परंतु मला असे वाटते की, या बाबतीत तुम्ही निर्णय घेणे कठीण आहे. म्हणून उद्या या सर्व विषयावर सभागृहामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी आणि उर्वरीत विनियोजन विधेयकामुळे घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला आहे हे लक्षात घेता आपण ॲडव्होकेट जनरल यांना सभागृहासमोर पाचारण करावे अशी माझी आपणास विनंती आहे. त्यापूर्वी मी शासनासमोर मांडलेल्या मुद्यांबाबत खुलासा व्हावा अशी विनंती करतो.

सभापती : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी चार-पाच मुद्दे मांडीत असतांना "मे.कौल आणि शकधर" यांचा आधार घेण्याचा प्रयत्न केला. या बाबतीत त्यांचा पहिला औचित्याचा मुद्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी फाईलवर केलेल्या सहीबाबत आहे. हा त्यांचा औचित्याचा मुद्दा मी ग्राहय धरीत नाही. त्यामुळे त्यासंबंधी सभागृहामध्ये मी भाष्य करणे योग्य होणार नाही. या ठिकाणी रुल ऑफ बिझिनेसप्रमाणे सरकारचे कामकाज चालते. त्या अनुषंगाने त्यासंबंधी निर्णय घेत असतांना सभापतींच्या असलेल्या मर्यादासंबंधी एवढेच सांगेन की, ज्याप्रमाणे हे सार्वभौम सभागृह आहे त्याप्रमाणे गव्हर्नमेंट इज अ सेपरेट ॲथॉरिटी. त्या अनुषंगाने मला असे वाटते की,रुल ऑफ बिझिनेसच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांची कोणती फाईल कशी आहे यासंबंधी मी सभागृहामध्ये भाष्य करणे योग्य होईल असे मला वाटत नाही. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे भारतीय घटनेमध्ये असलेल्या तरतुदीतील चार-पाच मुद्यासंबंधी सभागृहामध्ये बोलले. यापूर्वी सुध्दा त्यांनी या सभागृहामध्ये मला विनंती केली होती. त्यानुसार मी ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनिअन घेण्याकरिता तो संदर्भ त्यांच्याकडे पाठविला आहे. आज सुध्दा या ठिकाणी माननीय सदस्यांकडून अत्यंत महत्वाचे असे दोन-तीन मुद्दे उपस्थित करण्यात आले. ते मुद्दे सुध्दा मी ॲडव्होकेट जनरल यांच्या ओपिनिअनसाठी त्यांच्याकडे रेफर करणार आहे. आणि म्हणून माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या संपूर्ण चर्चेच्या अनुषंगाने ॲडव्होकेट जनरल यांना या ठिकाणी पाचारण करावे अशी सूचना केली असली तरी ॲडव्होकेट जनरल यांना ओपिनिअनसाठी पाचारण करण्याची या क्षणी आवश्यकता नाही असे माझे मत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण या ठिकाणी निवेदन करीत असतांना माझ्या काही मर्यादा आहेत व मला सभागृहाचे कामकाज हे लोकशाही पध्दतीने चालवावयाचे आहे असे सांगितले. विनियोजन विधेयकाच्या बाबतीत मिडियाला जास्त महत्व देण्याचे कारण नाही. वेगवेगळया वर्तमानपत्रामध्ये यासंबंधी वेगवेगळे इंटरप्रिटेंशन करण्यात आले आहे. त्यामध्ये माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

अर्थमंत्री माननीय राज्यपालांना भेटायला गेले परंतु त्यांची भेट झाली नाही असे छापून आले आहे. कदाचित तसे झाले नसेल. माननीय मुख्यमंत्री माननीय राज्यपालांना भेटायला गेल्याचे छापून आले आहे. विनियोजन विधेयकावर माननीय राज्यपालांनी सही करण्यास नकार दिला असे छापून आले. सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहाचे सदस्य म्हणून, पॉईंट ऑफ इन्फर्मेशन म्हणून सभागृहाबाहेर घडणाऱ्या घटनासंबंधी प्रश्न विचारण्याचा किंवा माहिती मिळविण्याचा संवैधानिक अधिकार आम्हाला आहे की नाही? सभापती महोदय, आपण फाईलसंबंधी व्यक्त केलेले मत बरोबर आहे. तसे मी आपल्याला म्हटलेले नाही. फाईलवर काय रिमार्क आहेत यासंबंधी आपण आदेश द्यावेत असे म्हणणे बरोबर नाही. यासंबंधी आपण घेतलेला निर्णय मला मान्य आहे. आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना मी विनंती केली की, या बाबतीत सद्यस्थिती काय आहे ती समजले पाहिजे. ते म्हणाले की तसे नाही. आणि म्हणून माननीय श्री. पाटील साहेब जर तसे नसेल तर मी मनाचा मोठेपणा ठेवून या सभागृहामध्ये क्षमा मागायला तयार आहे. माझे चुकीचे म्हणणे आपण सभागृहाच्या इतिवृत्तामध्ये कशासाठी राहू द्यायचे? तुम्ही जर माननीय मुख्यमंत्र्यांनी असे केलेले नाही असे सांगितले तर मी दिलगिरी व्यक्त करतो. अन्यथा या प्रश्नाची उत्तरे सरकारने दिली पाहिजेत. सभापती महोदय, आपण या ठिकाणी सांगितले की, माझ्या काही मर्यादा आहेत. तर मग आम्ही नियमाप्रमाणे या सभागृहामध्ये येतो, आपण दिलेला निर्णय आम्ही मान्य करतो. परंतु याबाबतीत माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना काही खुलासा करु द्यावा. आपण जर आमचे सर्वच विषय समाप्त केले तर आम्ही कुणाकडे न्याय मागायचा?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

या सार्वभौम सभागृहाचे सन्माननीय सदस्य म्हणून आम्ही माननीय राज्यपालांना भेटलो, आम्ही तुमच्या समोर मुद्दा मांडला, मुंबई हायकोर्टामध्ये प्रा.बी.टी.देशमुख आणि मी रिट केला, परंतु चार वर्षे झाली, त्याचे हिअरींग होत नाही. हायकोर्ट आमचे ऐकायला तयार नाही, गव्हर्नर साहेबांचे आदेश सरकार पाळत नाही, सरकार माहिती देण्यास तयार नाही. आम्ही काय करावे ? याबाबत मार्गदर्शन करावे. या सभागृहामध्ये या विषयाची माहिती मिळविण्याचा आम्हाला अधिकार आहे काय ? या बाबतीत आपण निर्णय दिला. सभापती महोदय, आता आम्ही कोणत्या मार्गाने विषय उपस्थित करावा ? याबाबतीत आम्हाला मार्गदर्शन करावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जी माहिती सदनामध्ये सदस्यांनी मागितली ती माहिती देणे बंधनकारक आहे, त्या विषयातील सगळी माहिती शासन आतापर्यन्त देत आलेले आहे. शासनाचे ते कर्तव्य आहे. पण फाईलवर प्रत्येक टप्प्याटप्प्यावर काय निर्णय दिलेले आहेत, याची माहिती घेऊन...वर्तमानपत्रमध्ये वाचून,सदनामध्ये प्रश्न उपस्थित करणे आणि प्रत्येक वर्तमानपत्रामध्ये वाचून या सदनामध्ये प्रश्न उपस्थित करणे, प्रत्येक टप्प्यावरील रिमार्कची माहिती देणे, असे यापूर्वी कधी सदनामध्ये घडलेले नाही...

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

...(अडथळा)...

आता माझी बाजू आपण ऐकून घेतली पाहिजे. सन्माननीय सदस्य अर्धा-पाऊण तास बोलत होते, तेव्हा कोणी काही बोलले नाही. तसे त्यांनी दुसऱ्याचेही पाच-दहा मिनिटे ऐकून घेतले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनी चांगले मुद्दे उपस्थित केले. खरेच या राज्यातील न्यायालयांचे खूप मोठे नुकसान झाले. ते फार चांगली वकिली करु शकले असते. एवढेच नव्हे तर "मे.कौल आणि शकधर" यांच्या पुस्तकातील रेफरन्स देऊन बोलले. एक गोष्ट चांगली झाली की, आपण कोर्टामध्ये गेला असता, तर नुसती चर्चाच होत राहिली असती, निकाल लागला नसता. त्यामुळे तिकडे निकाल लागत रहातात, इकडे चर्चा होत रहाते. दोन्ही ठिकाणी योग्य गोष्टी घडतात..... सभापती महोदय, अनेकवेळा फाईलवर रिमार्कस् लिहिले जातात, आदेश दिले जातात. पुन्हा राज्यभरातून शिष्टमंडळे घेऊन लोक येत असतात, मग सरकारला काही निर्णय घेणे देखील भाग पडत असते. सन्माननीय श्री.गडकरी साहेब, मी आपल्याला प्रामाणिकपणे सांगेन की, फक्त सहा महिन्यापूर्वी वैधानिक मंडळाची मुदत संपली होती. मंत्रिमंडळासमोर हा विषय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु....

आल्यानंतर, हे राज्य एकत्र रहायचे असेल, विदर्भातील, मराठवाड्यातील जनतेला न्याय मिळायचा असेल तर वैधानिक मंडळ गठित करण्याचा निर्णय हा अतिशय योग्य आहे. आपण हा निर्णय घेतला पाहिजे, म्हणून मंत्रीमंडळाने एकमताने त्याला मान्यता दिली होती. विदर्भाला पैसे मिळू नयेत, मराठवाड्याला पैसे मिळू नयेत, अशी सरकारची भावना आहे, असा कोणताही प्रश्न नाही. तसे असते तर वैधानिक मंडळाला मान्यता देत असतांनाच सरकार पुनर्विचार करु शकले असते.

सभापती महोदय, निधीमध्ये कमी जास्त झाले असेल हे कोणालाही प्रांजळपणाने कबूल करावे लागेल, ते मीही मान्य करतो. पण तरी सुध्दा पाटबंधारे मंत्र्यांनी सांगितले की, एका वर्षामध्ये एक हजार कोटी रुपये विदर्भातील इरिगेशनला दिले गेलेले आहेत, जे यापूर्वी महाराष्ट्राच्या इतिहासात कधीच दिले गेले नव्हते. आपण जे लढता, त्याचा निश्चितपणे उपयोग होतो आणि सरकारची देखील पैसे दिले पाहिजेत, अशी भावना आहे. मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतर अन्य शिष्टमंडळे उप मुख्यमंत्री म्हणून मला भेटले होते, मुख्यमंत्र्यांना भेटले होते. त्यातील एक खानदेशचे शिष्टमंडळ येऊन भेटले होते. त्यांची मागणी अशी होती की, तापीवरील त्यावेळचे मंत्री श्री.एकनाथ खडसे यांनी तापी प्रकल्पाच्या बॅरेजेसच्या कामांचे टेंडर काढून तसेच ठेवलेले होते. ह्युमन डेव्हलपमेंट इन्डेक्समध्ये नंदुरबार महाराष्ट्रात सगळयात खालच्या क्रमांकावर आहे. धुळ्यासारख्या जिल्ह्यामध्ये सातत्याने दुष्काळ पडतो. आमचा समावेश उर्वरित महाराष्ट्रामध्ये केल्यामुळे आम्हाला निधीच प्राप्त होत नाही, अडीच टक्के एकूण निधी प्राप्त होणार, त्यातून कृष्णा खोऱ्यातील अपुऱ्या कामांनाच निधी मोठ्याप्रमाणात जातो. आम्ही राज्याचा भाग आहोत की नाही ? येथ पर्यन्तची गांभीर्याने चर्चा त्या परिसरातील लोकांनी केली होती. ज्यावेळेस या पैशाच्या मंजुरीचा प्रश्न आला, त्यावेळेस कोकण विभागातील प्रतिनिधींनी आम्ही उर्वरित महाराष्ट्रामध्ये आहेत, कोकणासाठीही पैसे उपलब्ध होत नाहीत, सगळयात कमी इरिगेशन आहे,आम्हालाही निधी मिळाला पाहिजे, असा आग्रह धरला. सभापती महोदय, या मागासलेल्या दोन भागांचा विचार करत असतांना, एक प्रस्ताव असाही पुढे आला की, काही आतरराज्य प्रकल्प होते, त्यामध्ये कर्नाटकने आपला हिस्सा दिला होता, गोवा राज्याने आपला हिस्सा दिला होता, तिल्लारी हा प्रोजेक्ट तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये सिंचन निर्माण करणारा नव्हता.. त्या सरकारनी त्यांचा हिस्सा दिला आणि आपल्या राज्य सरकारने आपला हिस्सा दिला नव्हता. राज्यपालांच्या 7.5 च्या डायरेक्टीज खाली

अशुद्धलिखित प्रत / शोधनीसाठी नाही

SKK/ D/ MAP/

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु.....

राज्यपालांकडून काही सवलती मागण्याचा सरकारने प्रयत्न केला होता. खालच्या सदनामध्ये या संबंधाने सविस्तरपणाने चर्चा झाली. विनियोजन विधेयक अजून येऊ शकले नाही. विदर्भातील जनतेच्या भावना दुखावणार नाहीत, त्यांनाही निधी मिळेल, असा तोडगा निश्चितपणे राज्य सरकारतर्फे काढण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

सन्माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीचा मुद्दा उपस्थित केला. सभापती महोदय, ते आदेश दिल्यानंतर पुन्हा प्रत्येक वेळी प्रत्येक विभागाची फाईल, मग खानदेशच्या पैशाच्या बाबतीतील फाईल असेल, आंतरराज्य प्रकल्पाच्या बाबतीतील फाईल असेल, धरणग्रस्तांना पैसे देण्याच्या बाबतीतील फाईल असेल, हे सगळे विषय मंत्रिमंडळासमोर आले. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब, आपण मंत्री होता. आपल्याला या गोष्टीची कल्पना आहे की, कोणताही विषय माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेशिवाय मंत्रिमंडळासमोर येऊ शकत नाही. माननीय मुख्यमंत्री हे सुप्रीम असतात. त्यांच्या मान्यतेने हे सगळे विषय मंत्रिमंडळासमोर आले. मंत्रिमंडळाने एकत्रितपणे त्यावर निर्णय घेतला. सभापती महोदय, हे निर्णय होत असताना हेही दाखवून देण्यात आले होते की, यामध्ये विदर्भाला पैसे कमी आहेत. विदर्भाला 150 कोटी रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतला. वेगळ्या पध्दतीने ती मागणी या सदनासमोर आणि विधानसभेसमोर आहे. कोणी कोणाला ओव्हर-रुल केलेले नाही. संसदीय पध्दतीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना कोणी ओव्हर-रुल करु शकत नाही याची आपल्यालाही माहिती आहे. त्यामुळे कोणी कोणाला ओव्हर-रुल करण्याचा प्रयत्न किंवा प्रकार घडलेला नाही. विनियोजन विधेयकाच्या बाबतीत माननीय राज्यपालांनी अजून सही केलेली नाही म्हणजे त्यांनी सही नाकारली असा अर्थ कसा काढू शकतो ? एखाद्या गोष्टीवर विचार करण्याचा माननीय राज्यपालांना जरुर अधिकार आहे. कर्मचाऱ्यांचे पगार होतील की नाही ? शासकीय कामकाज थांबेल काय ? याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सभापती महोदय, आपल्याला पूर्णपणे 31 तारखेपर्यंत अवधी आहे. त्यामुळे 31 तारखेपर्यंत या मागण्या मान्य झाल्या, विनियोजन विधेयक मान्य झाले तर शासनाचे कोणतेही काम आणि कोणचाही पगार थांबू शकत नाही. त्यासाठी अजून कालावधी बाकी आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची आणि माननीय राज्यपालांची यासंदर्भात काही चर्चा झालेली आहे. खानदेशातील आमदार त्यांना जाऊन भेटलेले आहेत. त्यांच्या मान्यतेशिवाय विनियोजन विधेयक मांडले जाऊ शकत नाही. सरकारला पूर्णपणे विश्वास आहे की, ज्यामुळे सरकारचे कामकाज थांबणार नाही, बंद पडणार नाही अशा पध्दतीने आवश्यक त्या वेळेत विनियोजन विधेयक या सदनामध्ये मांडले जाईल. कारभार घटनेप्रमाणेच केला जाईल. माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणेच कारभार केला जाईल. कोणी कोणाला ओव्हर-रुल करण्याचा प्रकार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

होऊ शकत नाही. ज्यावेळी विनियोजन विधेयक येईल त्यावेळी जरुर आपल्याला प्रश्न उपस्थित करता येतील. या मुद्यावर सदनाचा वेळ जाऊ नये. आपल्या भागाचे प्रश्न आपण मांडता हा संदेश या सदनाच्या माध्यमातून जाण्याची आवश्यकता असते आणि माननीय श्री. नितीन गडकरी साहेब, गेले दोन दिवस आपण भरपूर संदेश पाठविण्यामध्ये यशस्वी ठरला आहात. त्यामुळे तुम्ही भांडत आहात, विरोधी पक्षात असताना विदर्भासाठी पोटतिडिकीने काम करत आहात इतका संदेश लोकांपर्यंत निश्चितपणे गेला आहे. विरोधी बाकावर असताना विदर्भाला आपण न्याय देता हा राहिलेला संदेश लोकांपर्यंत आम्ही नेऊ. सरकारकडून ज्या त्रुटी राहिल्या होत्या त्याबाबतचा संदेश आपण लोकांपर्यंत नेत आहात. दोघांचेही बरोबर झालेले आहे. त्यामुळे आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविलेले कामकाज करण्याची परवानगी द्यावी. विनियोजन विधेयक माननीय राज्यपालांची मान्यता घेऊन विहित वेळेत या ठिकाणी आणले जाईल.

श्री. नितीन गडकरी : मी केवळ विदर्भाबाबत सभागृहात मांडत नाही. खानदेशला द्यावयाच्या निधीला माझा विरोध नाही. पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत असा माझा आग्रह आहे. मला सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, आपण कॅबिनेटमध्ये विदर्भाला 150 कोटी रुपये दिले तसेच काही भागाला 50 कोटी रुपये, 100 कोटी रुपये दिले. आपण आधी 1941 कोटी रुपयांचे बजेट तयार केले होते. त्यानंतर ॲडिशनल 1041 कोटी रुपये आणले. त्याबाबत तुम्हाला माननीय राज्यपालांना सांगण्याची गरज होती की नाही ? तुम्ही त्यांना इंटिमेट केले काय ? त्यांना इंटिमेट न करता सगळ्या पैशाचे वाटप केले हे घटनेच्या नियमाप्रमाणे झाले काय ? खान्देशला 300 कोटी रुपयेच नव्हे तर 400 कोटी रुपये द्यावेत. त्याला माझा बिलकूल विरोध नाही. पहिली गोष्ट अशी की, मंत्रिमंडळामध्ये इरिगेशनच्या बाबतीत जो निर्णय घेतला ते पैसे माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार वाटण्याचा तुम्हाला अधिकार आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, तीच ती चर्चा सातत्याने व्हावयास लागली आहे.

श्री. नितीन गडकरी : आपण माननीय राज्यपालांना विचारले होते काय ? याबाबतीत माननीय राज्यपाल महोदयांना इंटिमेट केले होते काय ?

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विनियोजन विधेयक अद्याप विधानसभेने पारित केलेले नाही. त्यामुळे त्यानुषंगाने चर्चा करणे अप्रस्तुत ठरेल. मी आता पुढच्या कामकाजाकडे वळतो.

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून मार्गिकेमध्ये येतात आणि बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला या सदनामध्ये न्याय मिळणार नाही काय? या सभागृहाचे कामकाज असेच चालत राहाणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : आज कामकाजपत्रिकेवर दाखविलेल्या कामकाजाला आपण न्याय दिला पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला आमचे म्हणणे मांडायचे आहे...

उपसभापती : माननीय सदस्यांनी कृपा करुन आपापल्या जागेवर बसावे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलण्याची परवानगी देत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी 5 मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्यातील तीन मुद्यांसंबंधी माननीय सभापतींनी निर्णय दिला. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनीही खुलासा केला. दिनांक 24.3.2006 रोजी माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी फाईलवरील मुख्यमंत्र्यांच्या सहीचा मुद्दा या सदनामध्ये उपस्थित केला होता. त्याचप्रमाणे 1041 कोटी रु.च्या खर्चासंबंधी माननीय राज्यपालांची परवानगी घेण्यात आलेली आहे काय ? माननीय राज्यपालांच्या परवानगी शिवाय निधीचे वाटप करण्यात आले आहे काय ? हे देखील मुद्दे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केले होते. यासंदर्भात आजच्या वेगवेगळया वर्तमानपत्रातून वेगवेगळया बातम्या छापून आलेल्या आहेत. एका वर्तमानपत्रामध्ये "पुरवणी मागण्या मंजूर झाल्यामुळे विनियोजन विधेयकाला माननीय राज्यपालांच्या परवानगीची गरज नाही" अशी बातमी छापून आलेली आहे तर दुस-या वर्तमानपत्रामध्ये "विनियोजन विधेयक मांडण्यासाठी माननीय राज्यपालांनी परवानगी दिलेली नाही" अशी बातमी छापून आलेली आहे. अशा प्रकारच्या परस्पर विसंगत बातम्या वृत्तपत्रातून छापून आल्यामुळे या सदनातील माननीय सदस्यांच्या तसेच जनतेच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. विनियोजन विधेयक मांडण्यासाठी माननीय राज्यपालांच्या परवानगीची खरोखरच

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

आवश्यकता आहे काय, हे कोण सांगेल ? या सदनामध्ये अशा प्रकारचा पेचप्रसंग निर्माण झाल्यामुळे या बाबतीत ॲडव्होकेट जनरल यांचे मत घ्यावे किंवा त्यांना या सभागृहात पाचारण करावे असे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले. याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी फाईलवरील माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीसंबंधी खुलासा करताना सांगितले की, "तो विषय कॅबिनेट पुढे आणून त्यास मंजुरी घेण्यात आली, माननीय मुख्यमंत्री हे सुप्रिम असतात". परंतु फाईलवर माननीय मुख्यमंत्र्यांनी सही केलेली होती की नव्हती या प्रश्नाचे उत्तर मात्र मिळालेले नाही. तसेच माननीय राज्यपालांची परवानगी न घेता 1041 कोटी रु.चे वाटप करण्यात आलेले आहे काय ? त्यांची परवानगी न घेता ते खर्च करण्यात आलेले आहेत काय ? हे प्रश्न देखील अनुत्तरित आहेत. यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. एका वृत्तपत्रातील बातमीमध्ये घटनेतील कलमांचा संदर्भ देऊन "विनियोजन विधेयक मांडण्यासाठी राज्यपालांच्या परवानगीची गरज नाही" असे म्हटलेले आहे तर दुस-या एका वृत्तपत्रातील बातमीमध्ये "विनियोजन विधेयक मांडण्यासाठी माननीय राज्यपालांच्या परवानगीची गरज आहे" असे म्हटलेले आहे. तेव्हा या पेचप्रसंगाबाबत माननीय सदस्यांच्या मनामध्ये आणि जनतेमध्येही संभ्रम निर्माण झालेला असून त्याबाबतीत खुलासा झाला पाहिजे, अन्यथा हा संभ्रम कायम राहील. तेव्हा विनियोजन विधेयक मांडण्यासाठी माननीय राज्यपालांच्या परवानगीची आवश्यकता आहे की नाही, यासंबंधी खुलासा होणे आवश्यक आहे.

उपसभापती : वेगवेगळ्या वृत्तपत्रातून वेगवेगळे मतप्रवाह छापून आलेले आहेत, असे माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे आहे. मला असे वाटते की, वृत्तपत्रातून छापून आलेल्या सर्वच गोष्टी अचूक असतात असे मानण्याचे कारण नाही.

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : वर्तमानपत्रातील बातम्यांमुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे..

श्री. नितीन गडकरी : आम्हाला लोक बाहेर विचारत असतात. त्यांना आम्ही काय सांगायचे?

....नंतर श्री. कानडे...

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

उपसभापती : वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले सगळेच वृत्त हे सभागृहाचे मत होत नाही. विनियोजन विधेयक मांडण्यासाठी राज्यपालांची परवानगी आहे किंवा नाही याचा खुलासा उपमुख्यमंत्री महोदय करतील. विनियोजन विधेयक अद्यापपर्यंत विधानसभेने पारित केले नसल्यामुळे प्रश्न येत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 1041 कोटी रुपयांचे वाटप केले त्याला राज्यपालांच्या परवानगीची आवश्यकता आहे किंवा नाही ?

उपसभापती : विनियोजन विधेयक चर्चेला येईल त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी याबाबत प्रश्न विचारावा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा विषय पुरवणी मागण्यांच्या चर्चेमधील आहे. राज्यपालांकडून न्याय मिळत नसेल,हायकोर्टाकडून न्याय मिळत नसेल,आपण न्याय देणार नसाल तर न्याय कोणाकडून घ्यावयाचा ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कोणीही न्याय देणार नसले तरी लोकशाही आघाडीचे सरकार विदर्भाला नक्कीच न्याय देईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 1041 कोटी रुपये वाटले ही स्वागतार्ह गोष्टआहे. खानदेशाला दिले चांगले झाले,150 कोटी विदर्भाला दिले मी स्वागत करतो. कोकणाला सुध्दा पैसे देण्याची आवश्यकता आहे. सगळे छान झाले. कलम 371(2) प्रमाणे हे पैसे वाटायला राज्यपालांची परवानगी लागते किंवा नाही ? 1941 कोटी रुपयांच्या तरतुदीचे बजेट एक्सेस झाल्यावर नियमाप्रमाणे राज्यपालांना इंटीमेट करुन त्यांच्या परवानगीने हे पैसे वाटले आहेत काय एवढाच माझा प्रश्न आहे.

श्री. आर.आर.पाटील : आताच विनियोजन विधेयक राज्यपाल महोदयांच्या मान्यतेसाठी पाठविले आहे. खालच्या सदनामध्ये पुरवणी मागण्या मंजूर झालेल्या आहेत. येथेही चर्चा झालेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पैशाचे वाटप राज्यपाल महोदयांच्या निदेशाप्रमाणे झाले आहे किंवा नाही हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री. आर.आर.पाटील : विनियोजन विधेयकात पुरवणी मागण्यांच्या समावेश आहे आणि ते राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविले आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, जे पैसे वाटले ते राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार वाटलेले नाहीत. राज्यपालांच्या घटनात्मक तरतुदींचा भंग झालेला आहे. ॲडव्होकेट जनरलना आपण विचारले आहे. माझ्या प्रश्नाचे उत्तर शासनाने द्यावे.

डॉ. सुनील देशमुख : उप सभापती महोदय, सभापतींनी निर्णय दिला आहे की, पुरवणी मागण्यांवर चर्चा झालेली आहे. पैसे बरोबर वाटले किंवा नाहीत आणि राज्यपालांच्या निदेशानुसार वाटले काय यासंबंधात ॲडव्होकेट जनरलचे मत घेतले जाणार आहे. 1041 कोटी रुपये राज्यपालांच्या निदेशानुसार वाटले काय आणि वाटले नसतील तर ते वाटणे हे शासनाला अनिवार्य आहे काय याबद्दलच आपण ॲडव्होकेट जनरलचे मत मागविले आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहात तीन दिवसांपूर्वी उत्तर देतांना सांगितले होते की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार हे पैसे वाटण्यात आलेले नाहीत. त्यांचे मी अभिनंदन करतो. पण माननीय उप मुख्यमंत्र्यांची माहिती वेगळी आहे म्हणून नेमकी वस्तुस्थिती काय आहे ? माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशांचे पालन केले नाही ही बाब योग्य नाही.....

डॉ. सुनील देशमुख : मी जे बोललो आहे त्याच वाक्याशी मी ठाम आहे. मी हेच म्हणालो होतो की, 1041 कोटी रुपये माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे वाटलेले नाहीत हे खरे आहे पण ती रक्कम वाटणे अनिवार्य आहे की नाही यासंबंधीच आपण ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेत आहोत.

उपसभापती : ठीक आहे, या विषयावर चर्चा बराच वेळपासून सुरु आहे त्यामुळे मी या विषयावरील चर्चा येथेच थांबवून पुढील कामकाज पुकारतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आमच्यावर माननीय उप मुख्यमंत्री अन्याय करीत आहेत, निदान आपण तरी अन्याय करु नका.

उपसभापती : या एकाच विषयावर आता किती वेळ आपण चर्चा करणार आहोत ? आपल्या मताचा पूर्णपणे आदर करुन आपण ॲडव्होकेट जनरलचे मत मागवित आहोत. ते मत प्राप्त होताच यातून मार्ग निघेल.

श्री. नितीन गडकरी : आपण देखील आम्हाला न्याय देत नाहीत, माननीय राज्यपाल न्याय देत नाही, माननीय मुख्यमंत्री फक्त न्याय देत आहेत पण त्यांना धाकदपटशा दाखविण्यात येत असल्याने ते या सभागृहात येत नाहीत एवढे ते राष्ट्रवादी पक्षाला घाबरतात.....

उपसभापती : नियम 93 अन्वये सूचना मी आता पुकारीत आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात.)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

उपसभापती : सर्वश्री डॉ. नीलम गो-हे, श्री. सुरेश जेथलिया व इतर वि.प.स. यांनी "जालना शहरात मुलीचे अपहरण करुन तिच्यावर अत्याचार करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दलालामार्फत आदिवासी मुलांना कोळसा भट्टीवर डांबून ठेवण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. अनंत तरे व इतर वि.प.स. यांनी " म्हसळा (जि.रायगड) या गावात 200 जणांना गॅस्ट्रोची लागणे होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. सुरेश जेथलिया, दिवाकर रावते व इतर वि.प.स. यांनी "औरंगाबाद शहरात एका तरुणीवर केलेला सामूहिक अत्याचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. अरविंद सावंत व इतर वि.प.स. यांनी " 25 मार्च 2006 रोजी वसई तालुक्यातील तरुणाने कांदयाचे नुकसान झाल्यामुळे आत्महत्त्या करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी "शासनाने महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा दिल्यापासून कंत्राटी पध्दतीने नेमणुका करुन झालेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

उपसभापती .....

यानंतर प्रा. शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी "माण (जि.पुणे) येथील शेतकऱ्यांनी जमीन संपादनासाठी केलेला विरोध" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर इतर सूचना ज्या प्राप्त झालेल्या होत्या त्यांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

यानंतर श्री. भारवि .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

पृ.शी.: 'मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांचा होणारा उपद्रव'

मु.शी.: 'मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांचा होणारा उपद्रव' यासंबंधी डॉ.दीपक सावंत, सर्वश्री विलास अवचट, अनंत तरे, अरविंद सावंत, सुरेश जेथलिया, अनिल परब, जितेंद्र आव्हाड, जगन्नाथराव शेवाळे, प्रा.फौजिया खान, श्री.लक्ष्मणराव जगताप, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री सदाशिवराव पोळ, राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

...(गोंधळ)...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: 'मराठी चित्रपटसृष्टी पुनरूज्जीवित करण्यासाठी चित्रपट निर्मात्यांनी शासनाकडे केलेल्या विविध मागण्या.'

मु.शी.: 'मराठी चित्रपटसृष्टी पुनरूज्जीवित करण्यासाठी चित्रपट निर्मात्यांनी शासनाकडे केलेल्या विविध मागण्या.' यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, जगन्नाथ शेवाळे, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.लक्ष्मण जगताप, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री सदाशिवराव पोळ, राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

...(गोंधळ)...

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: 'राज्यातील बाजार समित्यांमधून शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येत असलेले आडात शुल्क.'

मु.शी.: 'राज्यातील बाजार समित्यांमधून शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येत असलेले आडात शुल्क.' यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी दिलेली केलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

....(गोंधळ)....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भिवंडी-ठाणे मार्गावरील रासायनिक गोदामांमध्ये होत असलेले स्फोट.

मु.शी.: भिवंडी-ठाणे मार्गावरील रासायनिक गोदामांमध्ये होत असलेले स्फोट यासंबंधी सर्वश्री रमेश निकोसे, संजय दत्त, गोविंदराव आदिक, जितेंद्र आव्हाड, जगन्नाथ शेवाळे, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.सदाशिवराव पोळ, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण, डॉ.अशोक मोडक, सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, प्रतापराव सोनवणे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

...(गोंधळ)...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

... (गोंधळ)...

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी./मु.शी.: विशेष उल्लेख

(सूचना मांडण्यात आल्या नाहीत.)

...(गोंधळ)...

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नियम स्थगित ठेवणे.

मु.शी.: नियम स्थगित करण्याबाबत वित्त राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव.

... (गोंधळ)...

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 228 (1) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन 2006-2007 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी."

...(गोंधळ)...

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

... (गोंधळ)...

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

मु.शी.: सन 2006-2007 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

उपसभापती : आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा 27 मार्च ते 29 मार्च 2006 अशी एकूण तीन दिवस होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरून निम्मा वेळ सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे व ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी.

...(गोंधळ)...

(चर्चेत कोणीही सन्माननीय सदस्य सहभागी झाले नाहीत.)

...(गोंधळ)...

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 28 मार्च 2006 रोजी, दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 6 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 28 मार्च 2006 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही